The findings are also supported by the findings of Munjal et al. (1985) while talking about the tribals but these findings are not in line in case of non-tribal farm women. The findings regarding tribals are also supported by Acharya (1988) who opined that women played major role in the performing activities of feeding, watching, watering of livestock, care of young stock, milking and cleaning of the area where animals were kept. Farm women spent 2.50 to 3.20 hours a day on animal husbandry activities. In tribal areas women were responsible for 60 percent of the work concerning feeding,

milking and handling of livestock. The labour input of women was more with regard to dairy farming operations.

RECOMMENDATIONS

In line with the findings, it could be recommended strongly that tribal farm women should be imparted training regarding improved practices of animal husbandry operations as they had been observed giving relatively more time to animal husbandry operations.

The areas where farm women are required to be trained are 'animal grazing', 'breeding care' and 'preparation of dairy products'.

It is also recommended based on the findings that non-tribal farm women should be motivated to exert more toward animal husbandry operations, so that, they could improve their livelihood by way of obtaining additional income from this occupation.

REFERENCES

1) *Acharya, R.M. (1988)* *"Appropriate Agricultural technologies of farm women, animal husbandry and dairying". Abstracts : International conference on appropriate agricultural technologies for farm women : 71, New Delhi.*

2) *Chakravarty, S (1975)* *"Farm women labour, waste and exploitation". Social Changes, 5 (9)*

3) *Munjal S, Grover, I and Sangwan V. (1985)* *"Women's economic contribution in farm households in Haryana", Indian Journal of Agricultural Economics, 40 : 274*

4) *Rani, Usha and Singh, O.B. (1992)* *"Economic performance of farm women of worker sections in dairy enterprise". Asian Journal of Dairy Research, 1 (3 & 4) : 206-216.*

SOMATOSCOPIC VARIATIONS AMONG THE SIDDHIS OF KARNATAKA

* P.P.Pavate

INTRODUCTION

To understand population variations physical anthropologists take the help of morphological characters. Most of the characters are measured accurately with proper instruments and the rest are measures by careful and systematic observations by the trained scientist. In this paper an attempt is made by the author to study somatoscopic observations on the Siddhi population in Karnataka.

Siddhi of Karnataka were brought to India from Ethiopia (Abyssinia) and other countries of East Africa as slaves by Muslim traders, Portuguese and Arab merchants around third century. In Karnataka the Siddhi inhabit four talukas of Uttar Kannada district namely Ankola, Haliyal, Yellapur and Mundgod. They live in satellites around the local villages in remote parts of the forest. The Siddhi are divided into three endogamous groups namely Hindus, Muslims and Christians.

MATERIAL AND METHODS

A sample consisting of 192 male individuals belonging to three endogamous groups of the Siddhi was observed for nineteen somatoscopic characters namely, skin colour, hair colour, hair form, hair texture, beard, moustache and body hair; eye colour, nasal depression, nasal bridge, nasal septum, lips, lips eversion, forehead slope, forehead height, chin and chin shape, porgnatism, ear lobe and physique.

* Department of Anthropology, Karnataka University, Dharwad-580003 Karnataka, India

A systematically prepared schedule was used for the purpose. Tabulation of such characters into broad categories based on qualitative judgement has been attempted. The author is fully conscious of the subjective bias which might affect the observation as many somatic characters to evaluate visually lack exactitude and objectivity. However, these observations form the basic part of the anthropometrics.

RESULTS AND DISCUSSIONS

The collected anbthroposcopic data has been tabulated and presented in the following tables with their associated comments.

SKIN COLOUR

Colour of the skin is a feature which at once strikes the eyes of all men. Broad colour definitions associated with major racial strain are faily welknown. Thus the Caucasoid are known as white race, Mangoloid as yellow race and the Negroid as black race through the colour has nothing to do with superiority or inferiority.

Table 1 shows the distribution of skin colour, absolute and percentile. The skin colour varies from black to light brown. In all three groups of the Siddhi more than 40% people are black to dark brown.

Table 1
Skin Colour
Distribution, absolute and percentile

Characters	Christian Siddhi		Muslim Siddhi		Hindu Siddhu	
	f	p.c.	f	p.c.	f	p.c.
Black	46	51.11	30	41.67	12	40.00
Dark Brown	36	40.00	30	41.67	11	36.67
Light brown	8	8.89	12	16.67	7	23.33
Total	90	100.00	72	100.01	30	100.00

Table 2
Hair Form
Distribution, absolute and percentile

Characters	Christian Siddhi		Muslim Siddhi		Hindu Siddhu	
	f	p.c.	f	p.c.	f	p.c.
Wavy	2	2.22	4	5.56	2	6.67
Woolly	39	43.34	43	59.72	13	43.33
Frizzy	49	54.44	25	34.72	15	50.00
Total	90	100.00	72	100.00	30	100.00

Table 3
Nasal Depression
Distribution, absolute and percentile

Characters	Christian Siddhi		Muslim Siddhi		Hindu Siddhu	
	f	p.c.	f	p.c.	f	p.c.
Slight	12	13.33	21	29.17	4	13.33
Medium	61	67.78	39	54.17	20	66.67
Depressed	17	18.89	12	16.67	6	20.00
Total	90	100.00	72	100.00	30	100.00

HAIR COLOUR

Hair colour is another character which has racial importance. Various shades of hair colours are found among the Caucasoid such as light brown, blond and dark brown. Black hair is characteristic of the Mangoloid and Negroid, but it is by no means restricted to them.

It is found that 70% people in all the groups of the Siddhi have black hair.

HAIR FORM

Hair form is a character of ehtnological significance. The recognised types are peppercorn,frizzly and woolly which are characteristics of the Negroid, straights of the Mangoloids and Caucasoid with often curly and wavy hairs in later.

Table 2 shows the distribution of hair form, absolute and percentile. Most of the Siddhi have woolly and frizzly hair. Frizzly or woolly type of hair are technically known as helicai hair. Aftrica and Melenesia are set to represent the great centres of helical hair in the world.

HAIR TEXTURE

Fine and stiffer texture of hair are found in the Caucasoid but much stiffer and coarser texture of straight hair is characteristic of the Mangoloid. The Negroids have much less coarser hair than the Mangoloid.

Majority of the Siddhi in all the three groups have coarse hair.

BEARD, MOUSTACHE AND BODY HAIR

Hairiness is a characteristic feature of Caucasoid. Scanty beard and little body hair are found among the Mongoloid and Negroid. Hence, they are less hirsute than the majority of white population in both body and beard hair.

Table 4
Nasal Bridge
Distribution, absolute and percentile

Characters	Christian Siddhi		Muslim Siddhi		Hindu Siddhu	
	f	p.c.	f	p.c.	f	p.c.
Straight	13	14.44	8	11.11	3	10.00
Concave	10	11.11	3	4.17	1	3.33
Convex	5	5.56	11	15.28	4	13.33
Concavo Convex	62	68.89	50	69.44	22	73.33
Total	90	100.00	72	100.11	30	100.00

Table 5
Lips Eversion
Distribution, absolute and percentile

Characters	Christian Siddhi		Muslim Siddhi		Hindu Siddhu	
	f	p.c.	f	p.c.	f	p.c.
Slight	42	46.67	45	62.50	13	43.33
Medium	15	16.67	6	8.33	1	3.33
Marked	33	36.67	21	29.17	16	53.33
Total	90	100.01	72	100.00	30	99.99

Table 6
Prognathism
Distribution, absolute and percentile

Characters	Christian Siddhi		Muslim Siddhi		Hindu Siddhu	
	f	p.c.	f	p.c.	f	p.c.
1 Facial						
Slight	43	47.78	54	75.00	20	66.67
Medium	32	35.56	2	2.78	0	0.00
Marked	8	8.89	1	1.39	2	6.67
Absent	7	7.78	15	20.83	8	26.67
II Alveolar						
Slight	48	53.33	46	63.89	18	60.00
Medium	6	6.67	2	2.78	0	0.00
Marked	30	33.33	16	22.22	11	36.67
Absent	6	6.67	8	11.11	1	3.33

More than 60% of Siddhi in all the three groups have slight beard and moustache and about 95% of them have thin body hair.

EYE COLOUR

Black colour of the eye is characteristic of mongoloid and negroid. most of the siddhi have dark brown eye colour.

NASAL DEPRESSION

nose is the one of the most important features for racial classification because it is capable of final definition and categrozation. Slight to very high bridge is characteristic feature of the Caucasoides whereas, depressed bridge is that of the Mongoloides, Negroides and Austroloides.

Table 3 shows the distribution of nasal depression. absolute and percentile. In the present study majority of the Siddhi have medium type of nasal depression and about 20% have depressed nose.

NASAL BRIDGE

Table 4 shows the distribution of nasal bridge, absolute and percentile in the three groups of the Siddhi. About more than 60% of the Siddhi have

concavo convex bridge and above 10% have straight nasal bridge.

NASAL SEPTUM

Horizontal type of nasal septum is most common followed by downward type in all the three groups of Siddhi.

LIPS

Medium to thick lips are common in all the groups of the Siddhi.

LIPS EVERSION

Table 5 shows the distribution of lips eversion in three groups of the Siddhi. Marked type of lip eversion is most common among the Hindu Siddhi as compared to other two groups.

FOREHEAD HEIGHT

Medium to high forehead height is common in all the three groups.

CHIN AND CHIN SHAPE

Medium type of chin is the commonest and as far as the shape is concerned round and squared are more frequent in all the groups.

PROGNATHISM

The presence of prognathism is a characteristic feature of Negroids. Table 6 shows the distribution of facial and alveolar prognathism in the three groups of the Siddhi. It is found that marked facial prognathisam is not at all common but marked alveolar prognathism is seen in more than 30% of Christian Siddhi and Hindu Siddhi, whereas, in the Muslim Siddhi it is around 22%.

EAR LOBE

This is a character which is easy to observe. Whether it has racial significance, is difficult to say. According to Hooton the "lobe is the useless, fatty excrescence of vestigial organ" (1946:522). Most of Siddhi have slight and free ear lobes.

PHYSIQUE

Majority of the Siddhi in all the three groups have medium to strong physique.

CONCLUSION

Three groups of the Siddhi exhibit similar morphological characters and represent a single homogeneous population. Almost all morphological characters observed there exhibit Nigrito elements and stand away from the Karnataka population when compared. Hence, the detailed study made by the author on Siddhi reveals that the Siddhi of Karnataka is of African origin. The present study also support to it.

REFERENCES

1) Cambell, J.M. Bombay Gazetteer, Bombay - Govt. Press, (1983)

2) Enthoven, R.E. The Tribes and Castes of Bombay, Vol.III, MacMillian and Co. Ltd., Govt. of Bombay, 332-336 (1922)

3) Hooton, E.A. Up from the ape, The MacMillan Company, New York, (1946)

4) Palakshappa, T.C. The Siddhis of North Karnataka, Sterling Publishers Pvt. Ltd, AB/9, Safdarjang Enclave, New Delhi, (1976I)

5) Patil, P.V. "A Bio-Medical study of Siddhi of Karnataka" Unpublished thesis submitted to the Karnatak University, Dharwad, (1999I)

6) Singh I.P. and Bhasin, M.K. Anthropology-A laboratory Manual on Biological Anthropology, Kamla Raj Enterprises, Delhi-11006, (1968)

7) The Cambridge History of India, III:271 (1928)

ACKNOWLEDGMENT

The author expresses his indebtedness to Dr. R.P.Srivastava, former Professor and Head, Department of Anthropology, University of Poona, Pune and Dr. Gai P.B., Professor, Department of Anthropology, Karnatak University, Dharwad for their valuable guidance and encouragement throughout this work.

महाराष्ट्रात एकूण (४७) अनुसूचित जमाती आहेत. या ४७ जमातीपैकी काही प्रमुख जमातींची या लेखांच्या माध्यमातून क्रमशः माहिती देण्यात येत आहे.

येथे लेखांच्याद्वारे देण्यात येणारी माहिती ही विविध संदर्भ ग्रंथातून संकलित करुन देण्यात येत आहे. या लेखांचा संशोधक व अभ्यासकांना उपयोग व्हावा या मागील मुख्य उद्देश आहे.

या लेखापासून महाराष्ट्रातील प्रामुख्याने धुळे जिल्ह्यातील भिल्ल अनुसूचित जमातीची माहिती देण्यात आली आहे.

आदिवासी भिल्लांची संस्कृती

* श्री.आर.डी.खरोसेकर,

प्रास्ताविक-

आदिवासी हा आद्य संस्कृतीचा द्योतक आहे. आदिवासी समाज म्हणजे 'अति प्राचीन समाज' किंवा 'अतिशय अप्रगत व गौण समाज ' असे समीकरण करणे चुकीचे आहे. भारतीय संविधानानुसार त्यांची सूची केलेली आहे. त्यामुळे या समूहांना 'अनुसूचित जमाती' असे म्हटले जाते. या जमातीच्या आदिम संस्कृतीचा मुख्य गाभा म्हणजे निसर्ग पूजा. या निसर्गपूजा धर्मात प्रत्येक वस्तुत प्राण असतो, असे समजण्यात येते.

इ.स.पूर्व १५०० या काळात नागर संस्कृती माहित नसलेल्या भटक्या टोळ्यांचा भारतावर म्हणजे सिंधु संस्कृतीवर जो आघात झाला त्या आधीचे लोक, ते 'आदिवासी' असे समजले जाते. वेशी, तटबंदी, दुर्ग, दरवाजे असूनही या संस्कृतीवर आर्यानी अचानक घाला घातला. सिंधु संस्कृतीचे लोक आर्यापेक्षा सुसंस्कृत होते. परंतू स्वभावाने शांत व भित्रे होते. हे लोक युध्द कौशल्यात व शस्त्रास्त्रात कमी पडले. त्यामुळे हे लोक आर्यांच्या हल्ल्याने डोंगरदऱ्या व जंगलाच्या आश्रयास पळाले. निषाद, किरात, शबर, नरभक्षक, धरतीचे काळेपुत्र इ.हिणकस नांवाने त्यांचा उल्लेख हेात असल्याचे वेद, पुराणात आढळते. उदा.शबरी भिल्लीण. आर्यांच्या भितीने या लोकांच्या अनेक टोळ्या निरनिराळ्या प्रदेशात स्थापित झाल्या. विंध्य, सातपुडा पर्वत रांगांचा या लोकांनी आश्रय घेतला.

विल्सन यांच्या मते 'भिल्ल' ही संज्ञा बिल्लु (धनुष्य) या द्रविड शब्दापासून आली आहे. धनुष्य या लोकांचे परंपरागत शस्त्र आहे. 'सातपुडा ' प्रदेश हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो.

* आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १

सातपुडा पर्वताच्या रांगामध्येच हा प्रदेश विखुरलेला आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्यात सातपुडा पर्वताच्या रांगा पसरलेल्या आहेत. सातपुडा पर्वतात अनेक लहान मोठ्या नद्या उगम पावत असल्या तरी हा प्रदेश प्रामुख्याने तापी आणि नर्मदा नद्यांच्या खोऱ्यांमधील आजूबाजूचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. या दोन नद्यांच्या खोऱ्यांमधील पहाडी प्रदेश आणि आजूबाजूचा सखल प्रदेश 'भिलवाड' म्हणजेच भिल्लांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना शबर, निषाद, किरात इ. नांवाने ओळखले जाते.हे लोक दुसरे तिसरे कोणी नसून सातपुड्यातील भिल्लच होत. कालौघात आदिम जमातीची अनेक प्रदेशात राज्ये निर्माण झाली. त्यांच्या अनेक संस्कृती विकसित झाल्या. त्यात नांव घेण्यासारखी गोंडांची व भिल्लांची संस्कृती प्रसिध्द होती. भिल्लांची स्वतंत्र राज्ये होती. त्यांचे स्वतंत्र वैभव होते. त्यांच्या स्वतंत्र भाषा होत्या. ह्या साऱ्या संस्कृती प्रांचीन विशाल आदिम संस्कृतीची वेगवेगळी रुपेच होती. आणि आजही त्यांच्या आदिम संस्कृतीचे जुनेपण व निराळेपण कामय टिकून आहे.

साधारणतः भिल्ल ही आदिवासी जमात वन्य जमात समजली जाते व ती जंगल व दऱ्याखोऱ्यातून वास्तव्य करुन आहे. परंतू मैदानी प्रदेशातही भिल्ल वस्ती आहे. ती पहाडाप्रमाणे स्वतंत्र भिल्लांच्या गांवाच्या रुपाने नसून इतर गांवाचा एक भाग जो 'भिलाटी' (भिल्ल हाटी) या नांवाने ओळखला जातो अशा स्वरुपात असते. या गांवात भिल्ल हा एक गांवकामगार व गांवगाड्यातला राखणदारीचे काम करणारा म्हणून ओळखला जातो. या कामाबद्दल त्यांना इनाम म्हणून सरकार काही जमीन देई. परंतू आता ह्या लोकांमध्ये हळूहळू शिक्षणाचा प्रसार होत असून बऱ्याच भिल्लांना सरकारी नोकरी मिळाल्याचे दिसून येते.

भिल्लांची वस्ती प्रामुख्याने सातपुडा पर्वत रांगामध्ये असली तरी महाराष्ट्रात या जमातीची वस्ती प्रामुख्याने धुळे, जळगांव आणि वेरुळ, अजिंठ्यातील पर्वतरांगामध्ये जास्त प्रमाणात आढळून येते. धुळे जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या सुमारे (१०) लाख आहे. त्यापैकी भिल्ल जमातीची लोकसंख्या (७) लाख

एवढी आहे. धुळे जिल्ह्यातील भिल्ल जमातीत अनेक शाखा असल्याचे दिसून येते. जसे की, गरडे भिल्ल, मावची, वळवी, वसावे, पाडवी, पावरा, तडवी, धानका, लाठ्या भिल्ल, बोंड गवाल भिल्ल, कोटले भिल्ल, रेड (धेड) भिल्ल, नाईक भिल्ल, गामीत, मेवाशी भिल्ल, खिश्चन इ.चा समावेश हेातो.

भिल्ल संस्कृती-

आदिवासी समाज हा पूर्ण अंधश्रध्देवर भर देणारा असल्याचे दिसून येते. मूळात भिल्ल हे दऱ्याखोऱ्यात राहणारे व अज्ञानात रुतलेले असून देवाधर्माच्या त्यांच्या कल्पना त्यांच्या स्वतंत्र आस्तित्वाला पोषक अशाच आहेत. निसर्गपूजक आदिवासी हे वाघदेव, धानदेव, सर्पदेव, डोंगरदेव, वेताळ, म्हसोबा इ.देवांना पूज्य मानतात. भिल्लांचे हे देवदेवता आहेत. त्यांची ते पूजा करतात. भूतखेते, जादुटोणा यावर त्यांचा चटकन विश्वास बसतो.

भिल्ल लोक दिव्याची आवस, नवीन पालवी (नव्याची पौर्णिमा), शिमगा असे हिंदुचे सण साजरे करतात. सामूहिक पध्दतीनेवस्ती करुन राहण्याची त्यांची पध्दत आहे. ते आपल्या जातीशी एकनिष्ट असतात.

सातपुड्यातील वाघदेव, रीमदेव, नंदूरादेव, पालुडोदेव, खेतराड्यादेव, बडादेव, महायोगी इ.देवदेवता भिल्लांच्या असल्याचे दिसून येते. त्याशिवाय प्रत्येक गांवाच्या सीमेवर 'हिवारिया' हा देव असतो. तर गांवात 'बनीजाह' हे दैवत असते. पावसाळ्यात वाघदेवाचा सण साजरा केला जातो. त्यावेळी देवाला कोंबडी कापून पालेभाजीचा नैवैद्य दाखविला जातो. रीमदेवाचा सण शिवरात्रीला साजरा केला जातो. तर पाऊस पडून गवत वर आले की गवत काढण्याच्या वेळी नंदूरा देवीची पूजा केली जाते. पळसाची पाने निघाल्यानंतर पाहुड्या देवाची पूजा केली जाते. निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे रानावनातील साप, विंचू इ.पासून संरक्षण मिळावे म्हणून नागपंचमीच्या दिवशी 'खेतराड' देवाजी पूजा करतात. प्रत्येक गांवाच्या सीमेवर असणारा हिवारिया हा देव म्हणजे भूतांचा राजा मानला जातो. याच्या पूजेला दारुचा नैवैद्य दाखविला जातो. तो गावाच्या सीमेचे रक्षण करतो, अशी त्यांची समजूत आहे.

भिल्लांचे मुख्य कुलदैवत म्हणजे सातपुड्यातील 'महायोगी' देवी होय. ही प्रत्येक आदिवासींचे श्रध्दास्थान आहे. महाशिवरात्रीला या देवीची जत्रा भरते. या देवीला फुलांची माळ,

नारळ, कुंकु, अगरबत्ती इ.साहित्य पूजेसाठी लागते. तसेच दारु, कोंबडी व बोकड कापल्यावर त्याचा नैवैद्यही दाखविला जातो. कोंबडी/बोकड कापले तरी तेथे सांडलेल्या रक्तावर माशी, कावळे, मुंग्या दिसत नाहीत, हे ह्या देवीचे जागृतपणाचे प्रतिक मानले जाते.

भिल्लांचे दुसरे एक प्रमुख दैवत तोरणमाळ येथील गोरखनाथाचे श्रध्दास्थान होय. सर्व महाराष्ट्रातून शिवरात्रीच्या आदल्या दिवशीपासून येथे सर्व भिल्ल जत्रेसाठी मोठ्या संख्येने हजर होतात. शिवरात्रीच्या आदल्या दिवशी गव्हाच्या पिठाचा मोठा रोडगा तयार करुन त्याला कच्चा दोरा गुंडाळतात.प्रसाद म्हणून वाटला जातो. या जत्रेनंतर गांवोगांवी रीमदेवाची पूजा होते व त्यावेळी बोकडाचा बळी दिला जातो.

भिल्ल जमात होळी, दिवाळी व दसरा हे हिंदूचे सणही मोठ्या उत्साहाने साजरे करतात. भिल्ल समाजात होळीला महत्वाचे स्थान आहे. होळीच्या दिवशी सर्व मुले व बारा वर्षाच्या आतील मुली पाच दिवस एकत्र जमून नाचतात. यात प्रामुख्याने पुरुष स्त्रियांचा पारंपारिक वेष परिधान करुन नाचतात. संपूर्ण गांवाची मिळून एकच होळी असते. गांवाचा भगत तिची पूजा करतो व डाळगुळाचा नैवैद्य होळीला अर्पण केला जातो. होळीच्या उत्सवात हे आदिवासी तनमनधनाने तल्लीन होऊन जातात. भिल्लांच्यात दोन प्रकारे होळी केली जाते. एक गोवऱ्या रचून व दुसरी लाकडाची.

सातपुड्यात पावरा भिल्लांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे पावरा (५) दिवस होळी साजरी करतात. होळीच्या अगोदर एक महिना जुन्या होळीच्या ठिकाणी सागाच्या लाकडाचा दांडा रोवून ठेवतात. नंतर होळीच्या दिवशी उंच बांबूचे झाड किंवा सावरांचा दांडा आणतात. होळीच्या खड्डयात तो दांडा रोवतात. प्रत्येक आदिवासी जंगलातून लाकडे गोळा करुन होळीसाठी आणतो. बांबू किंवा सावराच्या दांड्याभोवती ही सर्व लाकडे रचली जातात. उंच लाकडाची रास तयार होते. गांवच्या पाटलांकडून या होळीची पूजा केली जाते. लाकडाची होळी साधारणतः रात्री १२ ते ४ वाजण्याच्या दरम्यान पेटविली जाते. नंतर होळीला नैवैद्य दाखविला जातो व नंतर सर्व भिल्ल लोक होळीभोवती रात्रभर नृत्य करतात.

या लाकडाच्या होळीचा आणखी एक विशेष म्हणजे ज्या गांवी मेळावा असतो, त्या गांवी सुमारे १० ते १५ गांवाची नृत्यपथके

होळीभोवती धुंद होऊन नाचतात. काही वेळाने उंच बांबू किंवा सावरांचा दांडा रोवलेला असतो. तो पेटल्यावर खाली पडण्याच्या बेतात आला की दुसऱ्या लाकडाच्या सहाय्याने जमिनीला टेकू न देता वरच्यावर ठेवतात. ही वरच्यावर ठेवण्याची क्रिया धाऱ्या (धाऱ्या म्हणजे एक प्रकारचा भाला. त्याला विळ्यासारखे गोल तीक्ष्ण धारदार पाते असून ते बांबूला जोडलेले असते.) घेऊन पोलीस पाटील एका घावांत त्या बांबूचा किंवा सावऱ्याच्या दांड्याचा अग्रभाग तोडतो. नंतर ते त्याची पूजा करतात. नंतर गांवचा कोतवाल आजूबाजूच्या परिसरातील गांवाचा पुकार करतो. ज्या गांवचा पुकार असेल त्या गांवचा कारभारी किंवा पोलीस पाटील पुढे होऊन त्या हत्याराच्या सहाय्याने त्या बांबूचे फक्त एक घाव मारुन पाया पडून हत्यारे खाली ठेवत असतो. नंतर बांबूच्या अग्रभागाचा जो तुकडा असतो, ज्याला खोबऱ्याची वाटी बांधलेली असते, तो प्रसाद याच स्थानिक गांवातील नृत्यपथकास दिला जातो. त्यानंतर होळीभोवती सर्व लहानथोर वाद्यांच्या तालावर रात्रभर जागून होळी जागवतात. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात होळीचा सण साजरा केला जातो. यावेळी सरसकट दारुचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. होळी जसजशी जवळ येते तसतसे भिल्लांच्या उत्साहाला उधाण येते. बायका आपला गट करुन 'फाग' मागायला जातात तर पुरुष मंडळी सुध्दा होळीच्या अगोदर 'गेर' बनवतात. यावेळी बायका व पुरुष वेगवेगळी वेशभूषा करतात व रात्रभर दारु पिऊन नाचतात. होळीच्या दिवसात आदिवासी रोज नाचतात. तरी त्यांना थकवा येत नाही. एकच एक असते ती फक्त होळीची नशा. त्यात ते बेभान धुंद होऊन नाचत असतात व सणाचा आनंद मिळवित असतात. अशाप्रकारे होळीचा सण साजरा करतात.

गांडी दिवाळी -

भिल्लांच्यामध्ये दुसरा उत्सव म्हणजे 'गांडी दिवाळी'. 'गांडी दिवाळी' म्हणजे राजापनठा-गांडा ठाकूर आणि राणी काजळ या देवीदेवतांच्या नांवाने ही दिवाळी साजरी केली जाते. यात भिल्ल रात्रभर आदिवासी पारंपारिक पध्दतीचे नाटक करतात व सकाळी आदिवासी देवी-देवतांच्या नांवाने बकरा, कोंबडी बळी देतात. प्रत्येक गांवात वेगवेगळ्या दिवशी ही दिवाळी साजरी होते. बकरा, कोंबडी बळी देण्यासाठी वर्गणी काढून खर्च करतात. त्यासाठी भिल्ल आधीपासूनच आपले बजेट बसविण्याच्या खटपटीत असतो. कारण या दिवाळीच्या

दिवसात त्याचे इतर सर्व नातेवाईक एकत्र येतात व आनंदाने हा सण साजरा केला जातो. या सणाचे मुख्य वैशिष्ठय म्हणजे आदिवासी बोलीभाषेत पारंपारिक पध्दतीने रात्रभर चालणारे नाटक होय. त्यासाठी लांबून लांबून भिल्ल बैलगाड्या जुंपून येतात व थंडी असली तरी यात सहभागी होतात.

भिल्ल पुरुषाचा वेष म्हणजे कमरेला जेमतेम गुडघ्यापर्यंत पोचेल एवढे आखूड कापड गुंडाळेलेले असते. अंगात कुडता व डोक्याला पागोटे असते. कामाच्यावेळी ते फक्त कमरेला पंचा गुंडाळतात व डोक्याला पटका घालतात. स्त्रिया कमरेभोवती जुनेर गुंडाळतात. अंगात चोळी घालतात व डोक्यावर मुंडासे बांधतात. पुरुष व स्त्रिया दोघेही कानात चांदीच्या बाळ्या व बोटात चांदीची वेढणी घालतात. स्त्रिया दंडात कलिया, कंगणमाला, नथणी व इतर प्रकारचे दागदागिने घालतात.

भिल्ल आदिवासी हे छोट्या छोट्या वस्त्या करुन राहतात, ज्याला 'हाटी' किंवा 'पाडा' असे म्हणतात. वस्तीच्या प्रमुखाला 'डाह्या' असे म्हणतात. 'डाह्या' गांवातील तंटेबखेडे मिटवितो.

आदिवासींच्या चालीरितीत बहुपत्नीत्वाची व प्रौढ विवाहाची पध्दती रुढ आहे. त्यांच्यात विधवाविवाह संमत आहे. स्वजातीतील वधूवरांचे विवाह वडिलधाऱ्या मंडळीच्या सल्ल्याने होतात. विवाहाच्या वेळी मद्याची रेलचेल असते. नृत्यगायनाचा आनंदोत्सव साजरा केला जातो. भिल्ल पुरुषाला मामाच्या मुलीशी लग्न करता येते. परंतू आतेबहिणीशी किंवा मावसबहिणीशी लग्न करता येत नाही. ठरावाद्वारे बोलणी करुन लग्न ठरविले जाते. किंवा वराला आपल्या घरी नोकरीला ठेवून (घरजावई) घेऊन त्याच्याकडून चाकरी करुन घेतली जाते. काही ठिकाणी जावयाला दत्तक घेऊन लग्न करण्याचीही प्रथा आहे. जोडीदाराबरोबर पळून जावूनही लग्न केले जाते.

सातपुड्यातील भिल्लांची लग्नपध्दती मनोरंजक आहे. भिल्ल समाजात नवरा मुलगा मुलीला यात्रेत किंवा जत्रेत, बाजारात पाहतो व लग्नाची मागणी घालतो. मागणी घालून लग्न जमले नाही तर मुलीला तिच्या संमतीने पळवून नेतो. मुलीकडून दहेज, हुंडा घेतला जात नाही तर मुलाकडून मुलीला दहेज दिला जातो. ही रक्कम साधारणतः पाचशे ते हजार रुपयांपर्यंत

असते. लग्नाकरिता मुहूर्त पाहिला जात नाही. फक्त शनिवार व अमावस्या सोडून एरव्ही केव्हाही लग्न केले जाते. लग्न भगत लावतो. लग्नानंतर वधूवर मंडपाभोवती नऊ फेरे मारतात. लग्नात सर्वांना जेवण व दारु दिली जाते. लग्नप्रसंगी स्त्रिया व पुरुष आनंदाने नाचतात.

भिल्ल लोकांत परंपरागत पंचायत पध्दती चालत आलेली आहे व ती अजून आस्तित्वात आहे. सर्व प्रकारचे सामाजिक व धार्मिक प्रश्न या पंचायतीपुढे सोडविले जातात. पंचायतीच्या प्रमुखास 'नाईक' असे म्हणतात. नाईकाने दिलेले निर्णय सर्वांना बंधनकारक असतात व हे निर्णय सर्वच जण शिरोधार्य मानतात.

सातपुड्यातील भिल्लांमध्ये मृत्यु झाल्यानंतर मृताला जमिनीत पुरतात किंवा जाळतात. जाळलेल्या मृतांच्या अस्थीचे विर्सजनही केले जाते. एकाचवेळी एकाच घरात जास्त जणांचे मृत्यु झाल्यास त्या सर्वांचा एकच श्राध्दविधी केला जातो. या विधीच्या वेळी सर्वांना प्रथेप्रमाणे दारु दिली जाते. दारु पिऊन मृतात्म्याला शांती मिळावी म्हणून नृत्ये केली जातात. भिल्ल आत्मा मानतात व ते पुर्नजन्मावर विश्वास ठेवतात.

भिल्लांमध्ये स्वातंत्र्यसैनिक व वीरपुरुष होऊन गेले आहेत. उदा.भागोजी नाईक, तंट्या भिल्ल, खाज्या नाईक,कुवरसिंग वसावा, भीमा नाईक इ.या वीरांनी स्वातंत्र्य युध्दात भाग घेऊन देशसेवेचे व्रत अंगिकारले होते.

भिल्लांच्यात अमुलाग्र बदल घडवून आणणारी आणखी एक पूज्य व्यक्ती म्हणजे त्यांचे अध्यात्मिक गुरु संत आपश्री गुला महाराज हे होय. त्यांनी भिल्ल समाजाची अवनती कशामुळे झाली आहे हे ओळखले होते. हे दोन प्रमुख दोष म्हणजे १. पतीपत्नीमधील ढिले वैवाहिक संबंध व २. दारुची गुलामगिरी. त्यांनी हे दोष घालविण्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना चांगले यश प्राप्त झाले. त्यांनी स्वच्छतेचे महत्व भिल्लांना समजावून दिले व शिक्षणाची आवडही त्यांच्यामध्ये निर्माण करण्याचे प्रयत्न केले. कधीही तोंड वर करुन न पाहणारा भिल्ल, अबोल, अधोमुख, दुर्मुखलेला, भित्रा असा हा समाज 'आमचा पुर्नजन्म' झाला असे म्हणू लागला व ते केवळ गुला महाराज यांच्या चळवळीमुळेच. गुला महाराजांच्या प्रेरणेने व प्रयत्नाने भिल्ल समाजात अमुलाग्र बदल झाला

आहे. अशाप्रकारे भिल्ल समाजात बदल घडवून आणणारे आणखी व्यक्तीमत्व म्हणजे पू.ठक्करबाप्पा.

ठक्करबाप्पांनी भारतातील दीनदुबळ्या, दुःखी व दलितांसाठी अहर्निश सेवा कार्य करण्यात आपले आयुष्य वेचले. भारतात आज ज्या ज्या ठिकाणी आदिवासींसाठी समाज सेवा करणाऱ्या लहान मोठ्या संस्था आहेत त्या सर्वांचा पाया पू.ठक्करबाप्पांनी घातला आहे. भिल्लांचे जीवन सुखी व्हावे यादृष्टीने त्यांनी 'पंच महाल जिल्हा सेवा' मंडळाची स्थापना केली व कार्यकर्त्यांना एकत्रित आणून दूरच्या व दुर्गम भागात कार्य करण्यास सुरवात केली. त्यासाठी त्यांना स्वतःला व त्यांच्या कार्यकर्त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागला. यात सावकार, जमिनदार, व्यापारी, ठेकेदार इ.नी त्रास दिलाच परंतू भिल्लांकडूनही त्यांना योग्य ते सहकार्य सुरवातीस मिळाले नाही. परंतू त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले.

पू.ठक्कर बाप्पांप्रमाणेच अशा अनेक व्यक्तीनी या समाजास सुधारण्यासाठी या कार्यास वाहून घेतले. त्यापैकी नानासाहेब ठकार, धनाजी नाना तथा दादासाहेब चौधरी, बाळूभाई मेहता, जनार्दन महाराज (वळवी) इ.मान्यवरांनी बहुमोल सहकार्य केले व हा समाज सुधारण्यासाठी आपल्या परीने अथक प्रयत्न केले व हे प्रयत्न आजही चालूच आहेत.

अशाप्रकारे भिल्लांच्यात अनेक समाज सुधारकांनी हातभार लावून त्यांचे जीवन उजळण्यास मदत केली. तरीही अद्याप त्यांच्यात दुःख, दारिद्रय व दैन्य आहेच. तरीसुध्दा आज बऱ्याच प्रमाणात भिल्ल समाजात शिक्षणाचा प्रसार झालेला आढळून येतो. महाराष्ट्र शासनाने आदिवासींसाठी अनेक योजना राबविल्या आहेत. शासनाच्या या अनेक योजनांचा व प्रकल्पांचा भिल्ल समाजातील अनेक कुटुंबांना लाभ मिळत असून त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास होत आहे. शिक्षणामुळे समाजात अमुलाग्र बदल घडून येतो. ज्यामुळे आर्थिक विकास होण्यास मदत होते. यासाठी शासनाने आश्रमशाळा सुरु केलेल्या आहेत. आज या आश्रमशाळांचा उपयोग झालेला दिसून येत आहे. अनेक आदिवासी बांधव शिक्षण घेऊन मंत्री, उपमंत्री, डॉक्टर, वकील, शासकीय अधिकारी, शिक्षक या क्षेत्रात चमकत असल्याचे दिसून येत आहे.

या संस्थेद्वारा महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर स्पर्धा परीक्षांसाठी आयोजित केलेल्या

प्रशिक्षण कार्यक्रमास सन १९९९-२००० या वर्षात संस्थेत एकूण ३५४ विद्यार्थी महाराष्ट्रातून आले होते. त्यापैकी (३१) भिल्ल जमातीतील विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा फायदा घेतला आहे.

या संस्थेने केलेल्या बेंचमार्क सर्वेक्षण-२००० संबंधित तालुकानिहाय साक्षरता आकडेवारी खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

बेंचमार्क सर्वेक्षण-२००० नुसार भिल्ल जमातीची धुळे जिल्हयातील एकूण कुटुंबे व एकूण लोकसंख्या, साक्षर लोकसंख्येशी त्याचे प्रमाण दर्शविणारा तक्ता

अ. क्र.	तालुका	कुटुंब संख्या	लोकसंख्य			साक्षर लोकसंख्या %		
			पुरुष	स्त्री	एकूण	पुरुष	स्त्री	एकूण
१.	तळोदा	११३०८	२८९८२	२९१०५	५८०८७	९७२१	५६६५	१५३८६
						(४१)	(२३)	(३२)
२.	अक्राणी	११९२१	३७७६१	३७११७	७४८७८	८३५४	४५६४	१२९१८
						(२९)	(१६)	(२३)
३.	अक्कलकुवा	१७६०९	४८६०९	४८८४७	९७३५६	१२३१५	७३४७	१९६६२
						(३२)	(१९)	(२६)
४.	शहादा	१९७१६	५५१८९	५४०९७	१०९२८६	१५७२७	८१३६	२३८६३
						(३५)	(१९)	(२७)
५.	नंदूरबार	१४५१५	३४८७६	३५०५१	६९९२७	९८२२	५६४५	१५४६७
						(३३)	(१९)	(२६)
६.	साक्री	७४५९	२०२७१	१९५०६	३२७७७	३८४६	१९५७	५८०३
						(२३)	(१२)	(१८)
७.	नवापूर	१७८९५	४३३२२	४३६३२	८६९५४	१६०८२	९९९६	२६०७८
						(४४)	(२७)	(३५)
८.	शिरपूर	१४३९८	४०३९५	३८०२१	७६८४१६	८०८१	४१८०	१२२६१
						(२६)	(१४)	(२०)
	एकूण	११४८२१	३०९४०५	३०५२५६	६१४६८१	८३९४८	४७४९०	१३१४३८
						(३४)	(१९)	(२६)

संदर्भ :-१. सातपुड्यातील भिल्ल- डॉ.गोविंद गारे
२. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती- डॉ.गोविंद गारे
३. बेंचमार्क सर्वेक्षण-२०००-धुळे जिल्हा

महाराष्ट्र राज्यातील आदिम जमातीची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पाहणी

* श्री. पी.आर.तिकोने

प्रास्ताविक

सर्वसाधारणपणे 'आदिम जमात' हा शब्दप्रयोग अत्यंत मागास व अत्यंत गरीब आदिवासी जमातीकरिता वापरला जातो. आदिम जमातीचे लोक सुधारणेच्या मुख्य प्रवाहापासून दूर अति दुर्गम भागात स्वतंत्रपणे राहतात. या जमाती सर्वसाधारणपणे लहान स्वरुपाच्या असून प्रत्येक जमातीची स्वतंत्र सांस्कृतिक व मानववंशशास्त्रीय वैशिष्ट्ये आहेत.

आदिम जमाती ठरविण्यासाठी केंद्र शासनाने खालील तीन निकष घालून दिलेले आहेत.

१. पारंपारिक पध्दतीने शेती करणे
२. साक्षरतेचे अल्प प्रमाण
३. स्थिर किंवा घटत जाणारी लोकसंख्या

वरील निकषांच्या आधारे सध्या संपूर्ण भारतात एकूण ७४ आदिम जमाती असून, त्यापैकी कातकरी, कोलाम व माडिया (गोंड) या तीन आदिम जमाती महाराष्ट्र राज्यामध्ये आहेत.

सन १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ७८९.३७ लाख एवढी असून, त्यापैकी आदिवासी लोकसंख्या ७३.१८ लाख इतकी आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्या ९.२७ टक्के इतकी आहे. राज्यामध्ये एकूण ४७ जमाती असून त्यापैकी कातकरी, कोलाम व माडिया या तीन आदिम जमाती आहेत. माडिया ही ४७ जमातींतील अ.क्र.१८ वरील गोंड या जमातीची उपजमात आहे.

<u>वास्तव्य</u> :- कातकरी ही आदिम जमात प्रामुख्याने ठाणे, रायगड, नाशिक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व पुणे जिल्हयामध्ये आढळते. कोलाम ही जमात प्रामुख्याने यवतमाळ, नांदेड, चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये आढळते. तर माडिया ही गडचिरोली जिल्हयातील भामरागड, एटापल्ली, अहेरी इ.तालुक्यांत आढळते.

* संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १

लोकसंख्या :-सन १९६१ ते १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिम जमातीची लोकसंख्या खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र.१.१

अ. क्र.	जमात	जनगणना वर्ष			
		१९६१	१९७१	१९८१	१९९१ (अंदाजित)
१.	कातकरी	१३५८३९	१४६७८५	१७४६०२	२१८२५२
२.	कोलाम	४३५५५	५६०६१	११८०७३	१४७५९१
३.	माडिया (अंदाजित)	४२७२०	५३४००	६६७५०	८३४३७
एकूण आदिम जमाती		२२२११४	२५६२४६	३५९४२५	४४९२८०
राज्यातील एकूण आदिवासी लोकसंख्या		२३९७१५९	२९५४२४९	५७७२०३८	७३१८२८१
एकूण आदिवासी लोकसंख्येशी आदिम जमातीची टक्केवारी		९.२६	८.६७	६.२२	६.१४

टीप-
१. *सर्वसाधारण लोकसंख्या वाढीचा दर प्रत्येक वर्षास २.५ टक्के*
२. *सन १९९१ च्या जनगणनेमध्ये, जमातनिहाय आदिवासी लोकसंख्या प्रकाशित करण्यात आली नाही. सन १९८१ व १९९१ या दशकातील लोकसंख्या वाढीचा दर लक्षात घेऊन सन १९९१ ची अंदाजित लोकसंख्या काढण्यात आली.*
३. *माडियाची स्वतंत्र जनगणना झालेली नसल्याने तिची अंदाजित लोकसंख्या दर्शविण्यात आली आहे.*

साक्षरता :- तीनही आदिम जमातीचे सन १९६१ ते १९८१ मधील साक्षरतेचे प्रमाण खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्र.१.२

अ क्र	जनगणना वर्ष	लिंग	आदिम जमात		
			कातकरी	कोलाम	माडिया
१.	१९६१	व्यक्ती	२.३८	२.६२	७.००
		पुरुष	३.५८	४.८९	-
		स्त्री	१.१५	०.६८	-
२.	१९७१	व्यक्ती	२.८१	८.८१	१०.००
		पुरुष	४.८३	१४.९८	-
		स्त्री	०.६६	२.६८	-
३.	१९८१	व्यक्ती	४.५७	१८.८३	१३.००
		पुरुष	७.३६	२८.११	-
		स्त्री	१.६४	८.६६	-

टीप- सन १९६१ ते १९८१ च्या जनगणनेनुसार 'माडिया' या जमातीची स्वतंत्र लोकसंख्या उपलब्ध नसल्याने या जमातीची साक्षरतेची टक्केवारी ही कु.रेणुका पटनाईक यांनी १९९६ साली केंद्र शासनास सादर केलेल्या प्रबंधावर आधारीत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या ज्या जिल्हयामध्ये आदिवासी उपयोजना, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा व मिनीमाडा पॉकेटस आस्तित्वात आहेत, अशा जिल्हयांमधील आंदिवासींची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती जाणून घेण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या आर्थिक मदतीद्वारे नुकतेच 'बेंचमार्क सर्वेक्षण' घेण्यात आले. गांव, पाडा व कुटुंबपत्रकांद्वारे आदिवासींशी संबंधित अशी विविध स्वरुपाची माहिती गोळा करण्यात आली.

या लेखामध्ये आपण बेंचमार्क सर्वेक्षणांतर्गत कुटुंबपत्रकातील माहितीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, आदिम जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर भाष्य करीत आहोत.

१. <u>वास्तव्य</u> :-

खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार बेंचमार्क सर्वेक्षणामध्ये खालील जिल्हयांमध्ये आदिम जमाती वास्तव्य करुन राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. हे जिल्हे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील असून या व्यतिरिक्त या आदिम जमाती थोड्या-फार संख्येने आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरही आढळतात.

तक्ता क्र.१.३

अ.क्र	जमात	जिल्हे
१.	कातकरी	ठाणे,रायगड, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नांदेड, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली व चंद्रपूर
२.	कोलाम	ठाणे, रायगड, नाशिक, नांदेड, यवतमाळ, वर्धा,नागपूर, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली
३.	माडिया	अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली (प्रामुख्याने भामरागड व इटापल्ली तालुके)

वरील जिल्हयांमधील ठाणे व रायगड या जिल्ह्यांमध्ये कातकरी जमात, यवतमाळ, नांदेड व चंद्रपूर जिल्हयांमध्ये कोलाम जमात तर गडचिरोली जिल्हयातील भामरागड व इटापल्ली तालुक्यांमध्ये माडिया जमात बहुसंख्येने आढळते.

२. कुटुंबे व लोकसंख्या

तक्ता क्र.१.४

अ क्र	जमात	एकूण सर्वेक्षित कुटुंबे	लोकसंख्या		
			पुरुष	स्त्रिया	एकूण
१.	कातकरी	१४८६२ (३५%)	३४९८९	३३४३२	६८४२१ (३३%)
२.	कोलाम	१४१८२ (३३%)	३१७२९	३०६६८	६२३९७ (३०%)
३.	माडिया	१३३५१ (३२%)	३८७४९	३८१५६	७६९०५ (३७%)
	एकूण	४२३९५ (१००%)	१०५४६७ (५१%)	१०२२५६ (४९%)	२०७७२३ (१००%)

सर्वेक्षणात तीनही आदिम जमातीची एकूण ४२३९५ एवढी कुटुंबे आढळली. तीनही आदिम जमातींच्या एकूण कुटुंबांच्या तुलनेत ३५,३३ व ३२ टक्के कुटुंबे अनुक्रमे कातकरी, कोलाम व माडिया जमातीची आहेत. तर तीनही आदिम जमातींच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ३३, ३० व ३७ टक्के लोकसंख्या अनुक्रमे कातकरी, कोलाम व माडिया जमातींची आढळली. पुरुषाचे प्रमाण ५१ टक्के तर स्त्रियांचे प्रमाणे ४९ टक्के इतके आढळले.

३. साक्षरता :- तीनही आदिम जमातींमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार साक्षरता टक्केवारी आढळून आली.

तक्ता क्र.१.५

अ. क्र.	जमात	लिंग	६ वर्षावरील लोक-संख्या	साक्षर लोकसंख्या	साक्षरता टक्केवारी
१.	कातकरी	पुरुष	२९२७४	६३५१	२१.७०
		स्त्री	२७८४५	३००५	१०.७९
		एकूण	५७११९	९३५६	१६.३८
२.	कोलाम	पुरुष	२६०२४	११८८२	४५.९६
		स्त्री	२५२१६	७०१७	२७.८३
		एकूण	५१२४०	१८८९९	३६.८८
३.	माडिया	पुरुष	३१०४१	९३७२	३०.१९
		स्त्री	३०६३४	४९२६	१६.०९
		एकूण	६१६६५	१४२९८	२३.१९
	एकूण	पुरुष	८६३३९	२७६०५	३१.९७
		स्त्री	८३६८५	१४९४८	१७.८६
		एकूण	१७००२४	४२५५३	२५.०२

कातकरी या आदिम जमातीची साक्षरता टक्केवारी अन्य दोन आदिम जमातींच्या तुलनेत कमी असून ती १६.३८ टक्के इतकी आढळली. पुरुष व स्त्री साक्षरता टक्केवारीचा अन्य दोन जमातींच्या तुलनेत विचार केला असता कातकरी जमातीतील पुरुष व स्त्री साक्षरतेचा दर कमी असून तो अनुक्रमे २१.७० व १०.७९ टक्के इतका आढळला. तीन आदिम जमातींचा विचार करता सर्वात जास्त पुरुष साक्षरता दर हा कोलाम जमातीत आढळला असून तो ४५.६६ टक्के इतका आढळला. तर, स्त्री साक्षरतेचा दरही कोलाम जमातीत सर्वाधिक असून तो २७.८३ टक्के इतका आढळला.

३. <u>घरांची स्थिती</u> :-

अ. <u>मालकी प्रकार</u> :-सर्वेक्षणामध्ये घर कोणाच्या मालकीचे आहे यादृष्टीने आकडेवारी गोळा केली असता खालील स्थिती आढळून आली.

तक्ता क्र.१.६

अ.क्र.	जमात	मालकी प्रकारानुसार कुटुंब संख्या/टक्केवारी					
		स्वत:चे घर	इंदिरा आवास	गृहनिर्माण सोसायटी	भाड्याचे	इतर	एकूण
१.	कातकरी	११६२२ (७८)	२९५५ (२०)	७० (०)	१३४ (१)	८१ (१)	१४८६२ (१००)
२.	कोलाम	१२३६६ (८७)	१२१४ (९)	३० (०)	३१८ (२)	२५४ (२)	१४१८२ (१००)
३.	माडिया	१२७०४ (९५)	४१९ (३)	१०१ (१)	७४ (१)	५३ (०)	१३३५१ (१००)
	एकूण	३६६९२ (८७)	४५८८ (११)	२०१ (०)	५२६ (१)	३८८ (१)	४२३९५ (१००)

तीनही आदिम जमातींमध्ये स्वत:च्या मालकीचे घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ८७ टक्के आढळले. सर्वात जास्त प्रमाण माडिया जमातीत (९५%) आढळले असून त्या खालोखाल कोलाम व कातकरी जमातीचा क्रम लागतो. तीनही आदिम जमातींपैकी कातकरी कुटुंबांकडे 'इंदिरा आवास' योजनेमधून मिळालेल्या घरांचे प्रमाण जास्त असून त्या खालोखाल कोलाम व माडिया या जमातीचा क्रम लागतो. गृहनिर्माण सोसायटीद्वारे घरांची मालकी असलेल्या कुटुंबांचे प्रमाण नगण्य आढळले. तर अन्य दोन जमातींच्या तुलनेत कोलाम जमातीची कुटुंबे ही जास्त प्रमाणात भाड्याच्या घरात राहत असल्याचे आढळून आले.

ब. घरांचा प्रकार

तक्ता क्र.१.७

अ. क्र.	जमात	घरांच्या प्रकारानुसार कुटुंब संख्या/टक्केवारी						
		कच्ची घरे		पक्की घरे				एकूण
		झोपडी	मंगलौरी कौलांची झोपडी	मंगलौरी कौलांचे घर	पत्र्याचे पक्के घर	सिमेंट कॉक्रींटचे घर	इतर	
१.	कातकरी	६०७७ (४१)	५२७३ (३५)	३०४३ (२०)	३७० (२)	५५ (१)	४४ (१)	१४८६२ (१००)
२.	कोलाम	३४७३ (२४)	८७०२ (६१)	१३७५ (१०)	५३० (४)	४० (०)	६२ (१)	१४१८२ (१००)
३.	माडिया	१९२० (१४)	९५८१ (७२)	१५८८ (७२)	९३ (१)	२४ (०)	१४५ (१)	१३३५१ (१००)
एकूण		११४७० (२७)	२३५५६ (५६)	६००६ (१४)	९९३ (२)	१११ (०)	२५१ (१)	४२३९५ (१००)

आदिम जमातीतील बहुसंख्य कुटुंबांची घरे जरी स्वतःच्या मालकीची असली तरी त्या घरांचे बांधकाम हे कच्च्या स्वरुपाचे आढळले. म्हणजेच ८३ टक्के कुटुंबे ही कच्च्या घरांमध्ये राहतात. कच्च्या घरांच्या प्रकारामध्ये, २७ टक्के घरे ही 'झोपडी' या प्रकारातील तर ५६ टक्के घरे ही 'मंगलौरी कौलांची झोपडी' या प्रकारातील आढळली. फक्त १७ टक्के घरे ही पक्के बांधकाम असलेली आढळली असून सिमेंट कॉक्रींटच्या घराचे प्रमाण अगदी नगण्य आढळले. तीनही आदिम जमातींच्या कुटुंब आकडेवारीचा अभ्यास केला असता, सर्वात जास्त ८६ टक्के घरे ही माडिया जमातीची कच्च्या प्रकारातील असून त्या खालोखाल कोलाम व कातकरी जमातींचा क्रम लागतो.

क. घरांचे क्षेत्रफळ :-

तक्ता क्र.१.८

अ. क्र.	जमात	क्षेत्रफळनिहाय कुटुंब संख्या व टक्केवारी (क्षेत्रफळ चौ. फुट)						
		१०० चौ.फू. पर्यंत	१०१ ते २००	२०१ ते ३००	३०१ ते ४००	४०१ ते ५००	५०० चौ.फू.पेक्षा जास्त	एकूण
१.	कातकरी	२४६५ (१७)	६२७६ (४२)	३३९५ (२३)	१५२७ (१०)	६३९ (४)	५६० (४)	१४८६२ (१००)
२.	कोलाम	२८०७ (२०)	६०३१ (४३)	२००२ (१४)	१३९३ (१०)	७६६ (५)	११८३ (८)	१४१८२ (१००)
३.	माडिया	५८२ (४)	४७४७ (३६)	२८३६ (२१)	१९६६ (१५)	१२९८ (१०)	१९२२ (१४)	१३३५१ (१००)
एकूण		५८५४ (१४)	१७०५४ (४०)	८२३३ (१९)	४८८६ (१२)	२७०३ (६)	३६६५ (९)	४२३९५ (१००)

वरील तक्त्यातील आकडेवारीचा अभ्यास केला असता ३०० चौ.फू.पर्यंत घराचे क्षेत्रफळ असलेल्या सर्व आदिम जमातींच्या कुटुंबांची टक्केवारी ७३ इतकी आहे. जमातनिहाय ३०० चौ.फू.पेक्षा जास्त निवासी क्षेत्रफळाचा विचार करता, माडिया या आदिम जमातीतील कुटुंबांचे निवासी क्षेत्रफळ अन्य दोन आदिम जमातींच्या तुलनेत जास्त (३९ टक्के) दिसते.

५. <u>भूमिहीन व भू-धारक कुटुंबे</u> :-

तक्ता क्र.१.९

अ.क्र.	जमात	एकूण कुटुंबे व टक्केवारी	भूमिहीन कुटुंबे व टक्केवारी	भूधारक कुटुंबे/टक्केवारी			
				एकूण	पैकी निव्वळ बागायती भूधारक	पैकी निव्वळ जिरायती भूधारक	पैकी बागायती + जिरायती भूधारक
१.	कातकरी	१४८६२ (१००)	१२३५२ (८३)	२५१० (१७)	४८	२४१८	४४
२.	कोलाम	१४१८२ (१००)	८८९३ (६३)	५२८९ (३७)	१७८	४९२१	१९०
३.	माडिया	१३३५१ (१००)	२३३३ (१७)	११०१८ (८३)	९५४	९५३२	५३२
	एकूण	४२३९५ (१००)	२३५७८ (५६)	१८८१७ (४४)	११८०	१६८७१	७६६
				(१००)	(६)	(९०)	(४)

तीनही आदिम जमातींपैकी कातकरी व कोलाम जमातींमध्ये भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. माडिया जमातीमध्ये भू-धारक कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे.

भू-धारक कुटुबांचा विचार करता आदिम जमातीतील एकूण भूधारक कुटुंबापैकी कातकरी, कोलाम व माडिया या जमातींतील अनुक्रमे ९६,९३, व ८७ टक्के कुटुंबांकडे जिराईत शेतजमीन असलेली दिसते.

भूमीहीन कुटुंबे अन्य दोन जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीत जास्त आहेत. तर भूधारक कुटुंबे माडिया जमातीत जास्त आहे. बागायतो व जिरायती क्षेत्र जास्त असलेली कुटुंबे माडिया जमातीत आढळतात.

६. शेत जमिनीच्या आकारमानानुसार कुटुंबांचे वर्गीकरण :-

तक्ता क्र.१.१०

अ.क्र.	जमात	शेतजमिनीच्या आकारमानानुसार कुटुंबे/टक्केवारी						
		१ हेक्टरपर्यंत	१ ते २ हेक्टरपर्यंत	२ ते ३ हेक्टरपर्यंत	३ ते ५ हेक्टरपर्यंत	५ ते १० हेक्टरपर्यंत	१० हेक्टरपेक्षा जास्त	एकूण
१.	कातकरी	११७९ (४८)	९६४ (३८)	२१२ (८)	१२४ (५)	२७ (१)	४ (०)	२५१० (१००)
२.	कोलाम	३७२ (७)	२५७७ (४९)	७०८ (१३)	९५१ (१८)	५८४ (११)	९७ (२)	५२८९ (१००)
३.	माडिया	१९४५ (१८)	४५१६ (४०)	१९५६ (१८)	१८५८ (१७)	६६३ (६)	८० (१)	११०१८ (१००)
एकूण		३४९६ (१८)	८०५७ (४३)	२८७६ (१५)	२९३३ (१६)	१२७४ (७)	१८१ (१)	१८८१७ (१००)

वरील आकडेवारीचा अभ्यास करता, २ हेक्टरपर्यंत शेतजमिन असलेल्या आदिम जमातींच्या कुटुंबांची टक्केवारी ६१ इतकी आहे. तीनही जमातींचा विचार करता, अन्य दोन जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीतील कुटुंबांचे प्रमाण ८६ इतके आहे. अन्य दोन जमातीचे हे प्रमाण ५६ व ५८ इतके असल्याचे दिसते.

३ हेक्टर पर्यंत शेतजमिन असलेल्या आदिम जमातींच्या कुटुंबांची एकत्रित टक्केवारी ही ७६ इतकी दिसते. यामध्ये अनुक्रमे कातकरी, माडिया व कोलाम जमातींचा क्रम लागतो.

७. मुख्य व्यवसाय :-

तक्ता क्र.१.११

अ.क्र.	जमात	मुख्य व्यवसायानुसार कुटुंबे/टक्केवारी							
		शेती	दुग्ध	शेतमजूरी	नोकरी	लघुउद्योग	जंगलमजूरी	इतर	एकूण
१.	कातकरी	१७७६ (१२)	५ (०)	१२२९५ (८३)	१४१ (१)	४२ (०)	२३७ (२)	३६६ (२)	१४८६२ (१००)
२.	कोलाम	४८५१ (३४)	१० (०)	८७७० (६२)	२३८ (२)	५९ (०)	१८५ (१)	६९ (१)	१४१८२ (१००)
३.	माडिया	१०४४४ (७८)	१८ (०)	२२६० (१७)	१९८ (२)	२४ (०)	३६५ (३)	४२ (०)	१३३५१ (१००)
एकूण		१७०७१ (४०)	३३ (०)	२३३२५ (५५)	५७७ (२)	१२५ (०)	७८७ (२)	४७७ (१)	४२३९५ (१००)

वरील आकडेवारीचा अभ्यास करता, एकूण सर्व आदिम जमातीच्या कुटुंबापैकी ५५ टक्के कुटुंबे ही शेतमजूरी व्यवसायात गुंतलेली आढळली. यामध्ये कातकरी जमातीतील कुटुंबे ही सर्वाधिक असून त्याखालोखाल कोलाम जमातीच्या कुटुंबांचा क्रम लागतो.

शेती या व्यवसायाचा विचार करता, एकूण आदिम जमाती कुटुंबांच्या ४० टक्के कुटुंबे शेती व्यवसायत गुंतलेली आढळली. यामध्ये माडिया जमातीतील कुटुंबे सर्वाधिक असून त्याखालोखाल कोलाम जमातीचा क्रम लागतो.

कातकरी व कोलाम जमातींची सर्वाधिक कुटुंबे शेतमजूरी तर माडिया जमातीची सर्वाधिक कुटुंबे शेती या व्यवसायात गुंतलेली असल्याचे दिसते. उर्वरित व्यवसायामध्ये गुंतलेल्या आदिम जमातीच्या कुटुबांचे प्रमाण नगण्य आहे.

८. <u>वार्षिक उत्पन्न</u> :-

तक्ता क्र.१.१२

अ.क्र.	जमात	उत्पन्न स्त्रोतनिहाय सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये							
		शेती	दुग्ध	शेतमजूरी	नोकरी	लघुउद्योग	जंगल मजूरी	इतर	एकूण
१.	कातकरी	४०००	२०००	४०००	२००००	४०००	२०००	२०००	६०००
२.	कोलाम	७०००	२०००	४०००	२१०००	५०००	२०००	२०००	७०००
३.	माडिया	५०००	३०००	२०००	२२०००	३०००	२०००	१०००	७०००
	एकूण	६०००	२०००	४०००	२१०००	४०००	२०००	२०००	७०००

शेतीपासून सर्वात जास्त सरासरी वार्षिक उत्पन्न कोलाम जमातीचे असून ते रु.७००० इतके आढळले. तर सर्वात कमी उत्पन्न कातकरी जमातीचे असून ते रु.४००० इतके आढळले. नोकरी व शेती वगळता सर्व स्त्रोतांपासून मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न हे रु.१००० ते ५००० इतके आढळून आले.

तीनही जमातीतील कुटुंबांचे वरील तक्त्यात दर्शविलेल्या सर्व मार्गाने मिळालेले वार्षिक उत्पन्न रु.७००० इतके आढळले.

९. उत्पन्न गटानुसार कुटुंब संख्या व दारिद्रय रेषेखालील कुटुंबे

तक्ता क्र.१.१३

अ.क्र.	जमात	उत्पन्न गटानुसार कुटुंब संख्या व टक्केवारी							
		रु.२००० पर्यंत उत्पन्न	२००१ ते ३६००	३६०१ ते ५०००	५००१ ते ७०००	७००१ ते ११०००	११००१ ते २००००	२०००० पेक्षा जास्त	एकूण
१.	कातकरी	५७७ (४)	१९०० (१३)	४७९२ (३२)	४१३५ (२८)	३०३३ (२०)	३३७ (२)	८८ (१)	१४८६२ (१००)
२.	कोलाम	२३४ (२)	१३१४ (९)	४७४७ (३३)	३१९७ (२३)	३६५९ (२६)	८४० (६)	१९१ (१)	१४१८२ (१००)
३.	माडिया	१९८ (२)	१५१५ (११)	३४६३ (२६)	३७३३ (२८)	३२५१ (२४)	९९२ (७)	१९९ (२)	१३३५१ (१००)
एकूण		१००९ (२)	४७२९ (११)	१३००२ (३१)	११०६५ (२६)	९९४३ (२४)	२१६९ (५)	४७८ (१)	४२३९५ (१००)

सर्व आदिम जमातींचा एकत्रित विचार करता ४४ टक्के कुटुंबे ही रुपये ५०००/- पर्यंतच्या उत्पन्न गटात मोडतात. तर २६ व २४ टक्के कुटुंबे अनुक्रमे रु.५००१ ते ७००० व रु.७००१ ते ११००० या गटात असलेली आढळली. रु.५००० पर्यंतच्या उत्पन्न गटात कातकरी जमातींच्या कुटुंबाचा अन्य दोन जमातींच्या कुटुंबांच्या तुलनेत वरचा क्रम लागतो.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची उत्पन्न मर्यादा रुपये ११,०००/- इतकी धरल्यास तिनही आदिम जमातीतील एकूण कुटुंबांची टक्केवारी ९४ इतकी असल्याचे दिसते. यामध्ये जमातनिहाय विचार केला असता, सर्वात जास्त टक्केवारी ही कातकरी जमातीतील कुटुंबांची आहे. सुमारे ९७ टक्के कुटुंबे ही दारिद्रय रेषेखाली असल्याचे दिसते. त्या खालोखाल कोलाम (९३ टक्के) व माडिया (९१ टक्के) या जमातींचा क्रम लागतो.

१०) आरोग्य :- आजारपणासाठी दवाखान्या व्यतिरिक्त अन्य कोणत्या प्रकारच्या सुविधांचा वापर केला जातो याची माहिती गोळा करण्यात आली. ती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता क्र.१.१४

अ. क्र.	जमात	उपचार सुविधनिहाय कुटुंबे व एकूण कुटुंबांशी टक्केवारी			
		घरगुती उपचार	भगत	वैदू	एकूण कुटुंबे
१.	कातकरी	९५८० (६४)	४१४४ (२८)	४३४ (३)	१४८६२
२.	कोलाम	७०४५ (५०)	६६२ (५)	१६८ (१)	१४१८२
३.	माडिया	७२६० (५४)	५४९० (४१)	२९६६ (२२)	१३३५१
एकूण		२३८८५ (५६)	१०२९६ (२४)	३५६८ (८)	४२३९५

तीनही जमातीत घरगुती उपचार करणारी ५६ टक्के कुटुंबे आढळली.

'भगता' कडे उपचारासाठी जाणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २४ इतके आढळले. यामध्ये अन्य दोन जमातींच्या तुलनेमध्ये माडिया जमातीतील कुटुंबे जास्त फायदा घेत असल्याचे दिसते. त्या खालोखाल कातकरी जमातीचा क्रम लागतो.

वैदू कडे जावून उपचार करुन घेणाऱ्या तीनही जमातींच्या कुटुंबांची टक्केवारी ८ इतकी आढळली. यामध्ये अन्य दोन जमातींच्या तुलनेत माडिया जमातीतील कुटुंबांनी सर्वाधिक फायदा घेतल्याचे दिसते.

वैद्यकीय सुविधांचा स्वेच्छेने कोणत्या आजारासाठी वापर केला जातो अशी माहिती गोळा करण्यात आली. त्याची आकडेवारी खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र.१.१५

अ.क्र.	जमात	आजारांच्या कारणानुसार कुटुंबे व एकूण कुटुंबांशी टक्केवारी					
		आजारपण	लसीकरण	प्रसुतीपूर्व तपासणी	प्रसुती	कुटुंब नियोजन	एकूण कुटुंबे
१.	कातकरी	१४४०६ (९७)	५३३३ (३६)	२१६६ (१५)	१८०६ (१२)	२४०५ (१६)	१४८६२
२.	कोलाम	१३६८१ (९६)	४९०१ (३५)	२२८१ (१६)	२१३६ (१५)	२८३१ (२०)	१४१८२
३.	माडिया	१२८०८ (९६)	४०१८ (३०)	१४३० (११)	१०५१ (८)	२५१६ (१९)	१३३५१
एकूण		४०८९५ (९६)	१३३५२ (३१)	५८७७ (१४)	४९९३ (१२)	७७५२ (१८)	४२३९५

प्रसुतिपूर्व तपासणी, प्रसुती व कुटुंब नियोजन या स्त्रियांशी संबंधीत आजारांच्या कारणास्तव वैद्यकीय उपचाराचा वापर करुन घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे १४, १२ व १८ इतकेच आढळले. तर ३१ टक्के कुटुंबांनी स्वेच्छेने लसीकरणासाठी वैद्यकीय उपचाराचा वापर करुन घेतला.

आदिवासींमध्ये कोणत्या स्वरुपाचे दुर्धर आजार आढळून येतात याची माहिती गोळा केली असता खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार आकडेवारी आढळून आली.

तक्ता क्र.१.१६

अ.क्र.	जमात	दुर्धर आजारनिहाय व्यक्ती व टक्केवारी						
		क्षय	कॅन्सर	फायलेरिया	लेप्रसी	गॉयटर	आस्थामा	एकूण व्यक्ती
१.	कातकरी	११ (१६)	१ (१)	१ (१)	२३ (३३)	२ (३)	३२ (४६)	७० (१००)
२.	कोलाम	४४ (२७)	६ (४)	३ (२)	१३ (८)	११ (७)	८५ (५२)	१६२ (१००)
३.	माडिया	१५७ (३६)	२४ (६)	१४ (३)	३० (७)	२७ (६)	१७९ (४२)	४३१ (१००)
एकूण		२१२ (३२)	३१ (५)	१८ (२)	६६ (१०)	४० (६)	२९६ (४५)	६६३ (१००)

वरील तीनही जमातींच्या आकडेवारीचा अभ्यास करता, आस्थमा व क्षय या दुर्धर आजारांचे प्रमाण जास्त म्हणजे अनुक्रमे ४५ व ३२ टक्के इतके असल्याचे दिसते. त्या खालोखाल लेप्रसी या आजाराचा क्रम (१० टक्के)लागतो.

माडिया जमातीत विविध दुर्धर आजारांचे सर्वात जास्त रुग्ण आढळले. त्या खालोखाल कोलाम जमातीचा क्रम लागतो.

कातकरी जमातीत आस्थमा व लेप्रसीचे रुग्ण जास्त आढळले, तर कोलाम व माडिया जमातीत आस्थमा व क्षयाचे रुग्ण जास्त आढळले.

क्षय या आजाराचे रुग्ण माडिया जमातीत जास्त आढळले. अन्य दोन जमातींच्या तुलनेत माडिया जमातीमध्ये कॅन्सर, फायलेरिया, लेप्रसी व गॉयटर या आजाराचे ही रुग्ण जास्त आढळले.

११) शिक्षण :-

शैक्षणिक दर्जानुसार आदिम जमातीतील व्यक्तींची आकडेवारी खालील तक्त्यामध्ये नमुद करण्यात आली आहे.

तक्ता क्र.१.१७

अ. क्र.	जमात	६ वर्षा वरील एकुण व्यक्ती	शैक्षणिक दर्जानुसार व्यक्ती व टक्केवारी									
			लिहिता वाचता येणारे	इयत्ता ४ थी पर्यंत	इयत्ता ७ वी पर्यंत	इयत्ता १० वी पर्यंत	इयत्ता १२ वी पर्यंत	आय टी आय	डिप्लोमा	पदवी + पदव्युत्तर	इंजिनि अरिंग	मेडि-कल
१.	कातकरी	५७११९	६०१ (१)	५६३७ (१०)	२०५५ (४)	९६३ (२)	७९ (०)	३ (०)	७ (०)	९ (०)	१ (०)	१ (०)
२.	कोलाम	५१२६८	१२५९ (२)	१०२७५ (२०)	४२६८ (८)	२४७४ (५)	४६७ (१)	३० (०)	७६ (०)	६३ (०)	१ (०)	१ (०)
३.	माडिया	६१६६५	१२७७ (२)	७८३० (१३)	३०२२ (५)	१७१५ (३)	३८८ (१)	१२ (०)	२० (०)	२८ (०)	-	६ (०)
एकूण		१७००५२	३१३७ (२)	२३७४२ (१४)	९३४५ (५)	५१५२ (३)	९३४ (१)	४५ (०)	१०३ (०)	१०० (०)	२ (०)	८ (०)

तीनही आदिम जमातींच्या ६ वर्षावरील एकूण व्यक्तींच्या तुलनेत फक्त २ टक्के लोक निव्वळ लिहिता-वाचता येणारे आहेत. तर सर्वात जास्त म्हणजे १४ टक्के लोक इयत्ता ४ थी पर्यंत शिकलेले आढळले. या दोन्ही प्रकारात कातकरी जमातीच्या व्यक्तींचे प्रमाण अन्य दोन जमातीच्या तुलनेत खुपच कमी आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर, इंजिनिअरींग व मेडीकल मध्ये शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची संख्या नगण्य आढळली. सर्व शैक्षणिक दर्जामध्ये कातकरी जमात अन्य दोन जमातींच्या तुलनेत खुपच मागास वाटते. कोलाम जमातीची शैक्षणिक स्थिती अन्य दोन जमातींच्या तुलनेत चांगली आहे.

आदिम जमातींच्या स्त्रियांची शैक्षणिक स्थिती दर्शविणारी आकडेवारी खालील तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता क्र.१.१८

अ. क्र.	जमात	६ वर्षा वरील स्त्रिया	शैक्षणिक दर्जानुसार स्त्रिया व टक्केवारी									
			लिहिला वाचता येणाऱ्या	इयत्ता ४ थी पर्यंत	इयत्ता ७ वी पर्यंत	इयत्ता १० वी पर्यंत	इयत्ता १२ वी पर्यंत	आय टी आय	डिप्लोमा	पदवी + पदव्युत्तर	इंजिनिअ रिंग	मेडि-कल
१.	कातकरी	२७८४५	१९९ (१)	२०८२ (७)	५४९ (२)	१५६ (१)	१४ (०)	१ (०)	२ (०)	१ (०)	-	१ (०)
२.	कोलाम	२५२२९	४७४ (२)	४२१७ (१७)	१६१० (६)	६०६ (२)	९२ (०)	३ (०)	११ (०)	१० (०)	-	१ (०)
३.	माडिया	३०६२४	४५९ (२)	३०७७ (१०)	९४० (३)	३८७ (१)	५५ (०)	२ (०)	१ (०)	४ (०)	-	१ (०)
एकूण		८३६९८	११३२ (१)	९३७६ (११)	३०९९ (४)	११४९ (१)	१६१ (०)	६ (०)	१४ (०)	१५ (०)	-	३ (०)

तिनही आदिम जमातींच्या सर्वेक्षित एकूण स्त्रियांपैकी फक्त १ टक्काच स्त्रियांना निव्वळ लिहीता वाचता यैतें तर फक्त ११ टक्के स्त्रिया या ४ थी पर्यंत शिकलेल्या आहेत. उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांचे प्रमाण नगण्य आढळले. कातकरी स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खुपच कमी आहे. त्यानंतर माडिया या जमातीचा क्रम लागतो. या दोन जमातींच्या तुलनेत कोलाम जमातीच्या स्त्रियांची स्थिती थोडी बरी वाटते.

वरील दोन्ही तक्त्यांचा (१.१७ व १.१८) विचार करता, इयत्ता ४ थी नंतर इ.७वी, १० वी, १२ वी, पदवी या क्रमाने शैक्षणिक दर्जामध्ये व्यक्तींची संख्या घटत गेल्याचे दिसून येते.

३ ते १६ वयोगटातील शाळेत जाणाऱ्या व शाळेत न जाणाऱ्या मुलां-मुलींची आकडेवारी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

तक्ता क्र.१.१९

अ. क्र.	जमात	शाळेत जाणारी मुले-मुली व टक्केवारी	शाळेत न जाणारी मुले-मुली व टक्केवारी	एकूण
१.	कातकरी	८८३८ (३८)	१४४७६ (६२)	२३३१४ (१००)
२.	कोलाम	१४०३३ (६२)	८४६४ (३८)	२२४९७ (१००)
३.	माडिया	१५२१५ (५३)	१३४७९ (४७)	२८६९४ (१००)
	एकूण	३८०८६ (५१)	३६४१९ (४९)	७४५०५ (१००)

तिनही आदिम जमातींच्या एकूण लोकसंख्येच्या ३६ टक्के इतके प्रमाण ३ ते १६ या वयोगटातील मुलां-मुलींचे आढळून आले. ३ ते १६ वयोगटातील मुलां-मुलींपैकी ५१ टक्के मुलें-मुलीं या शाळेत जाणाऱ्या तर ४९ टक्के मुलें-मुलीं या शाळेत न जाणाऱ्या आढळल्या.

शाळेत जाणाऱ्या मुलां-मुलींमध्ये माडिया व कोलाम जमातीतील मुलां-मुलींचे प्रमाण जास्त आढळले. तर शाळेत न जाणाऱ्या मुलां-मुलींमध्ये कातकरी जमातीतील मुलां-मुलींचे प्रमाण जास्त आढळले.

तक्ता क्र.१.२०

अ. क्र.	जमात	शाळेत जाणाऱ्या मुलींची संख्या व टक्केवारी	शाळेत न जाणाऱ्या मुलींची संख्या व टक्केवारी	एकूण मुली
१.	कातकरी	३६८२ (३४)	७१२२ (६६)	१०८०४ (१००)
२.	कोलाम	६६१२ (६१)	४२३५ (३९)	१०८७७ (१००)
३.	माडिया	६५१२ (४७)	७४८१ (५३)	१३९९३ (१००)
	एकूण	१६८०६ (४७)	१८८६८ (५३)	३५६७४ (१००)

वरील तक्त्याचा अभ्यास केला असता, एकूण सर्वेक्षित आदिवासी लोकसंख्येच्या १७ टक्के इतक्या मुली ३ ते १६ या वयोगटात आढळल्या. यामध्ये अन्य दोन आदिम

जमातींच्या तुलनेत माडिया जमातीत जास्त मुली असल्याचे आढळून आले. एकूण आदिम जमातींच्या मुलींपैकी ४७ टक्के मुली या शाळेत जाणाऱ्या आढळल्या असून त्यामध्ये कोलाम जमातीतील मुलींचे प्रमाण जास्त आहे. एकूण आदिम जमातींच्या मुलींपैकी ५३ टक्के मुली या शाळेत न जाणाऱ्या असून त्यामध्ये कातकरी व माडिया या जमातीतील मुलींचे प्रमाण जास्त आहे.

एकूण कातकरी जमातीच्या मुलींपैकी ६६ टक्के मुली या शाळेत न जाणाऱ्या आढळल्या तर त्या खालोखाल माडिया जमातीतील मुलींचा क्रम लागतो.

१२) शासकीय विकास योजनांचा लाभ :-

शासनामार्फत विविध स्वरुपाच्या कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा किती कुटुंबांनी लाभ घेतला याची माहिती खालील तक्त्याद्वारे दिसून येत आहे.

तक्ता क्र.१.२१

अ. क्र.	जमात	लाभार्थी कुटुंबे व टक्केवारी	लाभ न झालेली कुटुंबे व टक्केवारी	एकूण सर्वेक्षित कुटुंबे
१.	कातकरी	८९१७ (६०)	५९४५ (४०)	१४८६२ (१००)
२.	कोलाम	८७२३ (६२)	५४५९ (३८)	१४१८२ (१००)
३.	माडिया	१००९८ (७६)	३२५३ (२४)	१३३५१ (१००)
एकूण		२७७३८ (६५)	१४६५७ (३५)	४२३९५ (१००)

तीनही आदिम जमातींच्या एकूण कुटूंबापैकी ६५ टक्के कुटूंबांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचे दिसते. तर ३५ टक्के आदिम जमातींच्या कुटूंबांना योजनेचा लाभ झाल्याचे दिसून येत नाही. लाभ न झालेल्या एकूण कुटूंबाच्या तुलनेत, कातकरी जमातीचा क्रम वरचा असून त्या खालोखाल कोलाम जमातीचा क्रम लागतो.

ज्या कुटुंबांना योजनेचा लाभ झाला नाही त्यामागचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याची आकडेवारी खालील तक्त्यात नमुद करण्यात आली आहे.

तक्ता क्र.१.२२

अ. क्र.	जमात	कारणनिहाय लाभ न झालेली कुटुंबे व टक्केवारी		
		योजनांची माहिती नसणे	कागदपत्रांची पुर्तता करण्यास असमर्थ/ योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्याची उदासिनता/आर्थिक तरतूद करण्यास असमर्थ इ.	एकूण
१.	कातकरी	४६८७ (७९)	१२५८ (२१)	५९४५ (१००)
२.	कोलाम	४७३४ (८७)	७२५ (१३)	५४५९ (१००)
३.	माडिया	२५३९ (७८)	७१४ (२२)	३२५३ (१००)
एकूण		११९६० (८२)	२६९७ (१८)	१४६५७ (१००)

लाभ न झालेल्या एकूण आदिम जमातींच्या कुटूंबांपैकी ८२ टक्के कुटूंबांनी योजनांची माहिती नसल्याचे कारण नमुद केले आहे. उर्वरित १८ टक्के कुटूंबांना योजनांची माहिती आहे परंतु आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता वेळेत करता आली नाही, योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांकडून योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही, थकबाकीदार असल्याने, योजनेचा फायदा घेण्यापूर्वी करावयाची आर्थिक तरतूद वेळेत उपलब्ध न झाल्याने इत्यादी कारणांमुळे योजनांचा लाभ घेता आला नाही. अशी कारणे नमुद केली आहेत.

शासनाच्या कोणकोणत्या विकास क्षेत्रांतर्गत विविध योजनांचा आदिवासी आदिम कुटूंबांनी जास्त फायदा घेतला हे खालील तक्त्यातील आकडेवारीवरुन दिसून येईल.

तक्ता क्र.१.२३

अ.क्र.	विकास क्षेत्र	जमातनिहाय कुटुंब संख्या / एकुण लाभार्थी कुटुंबांशी टक्केवारी			
		कातकरी	कोलाम	माडिया	एकूण
१.	कृषी व संलग्न सेवा	२४३ (३)	१७५ (२)	१७५१ (१७)	२१६९ (८)
२.	ग्रामीण विकास	३९०४ (४४)	१५७८ (१८)	१२३५ (१२)	६७१७ (२४)
३.	पाटबंधारे	९ (०)	११ (०)	१०३ (१)	१२३ (०)
४.	उद्योग	८ (०)	२ (०)	११ (०)	२१ (०)
५.	शिक्षण	४१९६ (४७)	५७५६ (६६)	६६८३ (६६)	१६६३५ (६०)
६.	कामगार कल्याण	२ (०)	६ (०)	१५ (०)	२३ (०)
७.	आदिवासी आयुक्तालय सर्वसाधारण योजना	३६४ (४)	८५९ (१०)	२९०१ (२९)	४१२४ (१५)
८.	केंद्रवर्ती अर्थसंकल्प (आदिवासी विकास विभाग)	४७५८ (५३)	४४२३ (५१)	६१९४ (६१)	१५३७५ (५५)
९.	आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था	३० (०)	५ (०)	२१ (०)	५६ (०)
१०.	आदिवासी विकास महामंडळ	८२४ (९)	१२१५ (१४)	१६५५ (१६)	३६९४ (१३)
	एकूण लाभार्थी कुटूंबे	८९१७	८७२३	१००९८	२७७३८

टिप : १) एकापेक्षा जास्त योजनांचा फायदा घेतला असल्यामुळे टक्केवारी जुळणार नाही.

२) टक्केवारी ही लाभार्थी कुटूंबावर आधारित आहे.

तिनही आदिम जमातींच्या एकत्रित लाभार्थी कुटूंबांचा विचार केला असता, शिक्षण व आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांचा (तक्त्यातील अ.क्र.७ ते १०) लाभ सर्वाधिक कुटूंबांनी घेतला असल्याचे दिसून येते.

कृषी व संलग्न सेवा आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांतर्गत विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या कुटूंबांची संख्या कमी दिसते.

जमातनिहाय विचार केला असता,

१३) <u>स्थलांतरीत कुटुंबे</u> :-

कातकरी, कोलाम व माडिया जमातीतील सर्वाधिक कुटूंबांनी आदिवासी विकास विभाग व शिक्षण विभागाच्या योजनांचा फायदा घेतला असल्याचे दिसते.

कृषी व संलग्न सेवांतर्गत विविध योजनांचा सर्वाधिक फायदा माडिया जमातीतील कुटूंबांनी तर ग्रामीण विकास विभागाच्या विविध योजनांचा सर्वाधिक फायदा कातकरी जमातीच्या कुटूंबांनी घेतल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.१.२४

अ. क्र.	जमात	एकूण सर्वेक्षित कुटूंबे	स्थलांतरित कुटूंबे	स्थलांतरित कुटूंबांचे एकूण कुटूंबांशी प्रमाण
१.	कातकरी	१४८६२	७४४२	५०
२.	कोलाम	१४१८२	१७२७	१२
३.	माडिया	१३३५१	४५३८	३४
एकूण		४२३९५	१३७०७	३२

वरील तक्त्यातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, रोजगार व व्यवसायानिमित्त स्थलांतरीत झालेल्या एकूण आदिम जमातींच्या कुटूंबांची टक्केवारी ३२ इतकी आढळली.

अन्य दोन जमातींच्या तुलनेत स्थलांतरीतांचे प्रमाण कातकरी जमातीमध्ये सर्वाधिक आहे. त्या खालोखाल माडिया जमातीचा क्रम लागतो.

<u>निष्कर्ष</u>

१. बेंच मार्क सर्वेक्षणात तीन ही आदिम जमातींची कुटूंबे व लोकसंख्या ही एकमेकांच्या तुलनेत संख्येने जवळपास सारखीच आढळली.

२. तीनही आदिम जमातीत स्त्रियांच्या मानाने पुरुष साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

३. अन्य दोन जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीतील पुरुष व स्त्री साक्षरतेचे प्रमाण खुपच कमी आहे. माडिया जमातीतील स्त्रियांचे ही साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

४. कातकरी, कोलाम व माडिया जमातीत स्वतःची मालकी असलेल्या घरांची संख्या सर्वाधिक (८७%) आहे.

५. अन्य दोन जमातींच्या तुलनेत इंदिरा आवास योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या घरांची संख्या कातकरी जमातीत जास्त (२०%) आढळली.

६. तीनही जमातीतील सर्वाधिक ८३ टक्के कुटूंबे 'कच्च्या' घरांमध्ये राहत असल्याची आढळली. यामध्ये २७ टक्के कुटूंबे ही निव्वळ झोपडीमध्ये राहत असल्याची आढळली.

७. तीनही आदिम जमातींच्या सर्वेक्षित एकूण कुटूंबांपैकी निम्मी कुटूंबे (५४%) ही ०-२०० चौ. फुट क्षेत्रफळ आकारमान असलेल्या घरांमध्ये राहत आहेत.

८. कातकरी व कोलाम जमातीत भूमिहीन कुटूंबांची संख्या सर्वाधिक (अनुक्रमे ८३ व ६३ %) आहे.

९. माडिया जमातीत भू-धारक कुटूंबे सर्वात जास्त (८३%) आहेत.

१०.एकूण भू-धारक कुटूंबांपैकी 'जिराईत' शेतजमीन असलेल्या कुटुंबांची संख्या सर्वात जास्त (९०%) आहे.

११. एकूण भू-धारक कुटुंबांपैकी निम्मी कुटुंबे अल्पभूधारक असून त्यामध्ये कातकरी जमातीचा क्रम वरचा आहे.

१२.तीनही आदिम जमातींच्या एकूण कुटूंबांपैकी ५५ टक्के कुटूंबे ही 'शेतमजुरी' या व्यवसायात गुंतलेलली आहेत. यामध्ये सर्वाधिक कुटुंबे कातकरी जमातींची असून त्या खालोखाल कोलाम जमातीचा क्रम लागतो.

१३.तीनही आदिम जमातींच्या एकुण कुटूंबांपैकी ४० टक्के कुटुंबे ही 'शेती' या व्यवसायात गुंतलेली आहेत. यामध्ये सर्वाधिक कुटूंबे माडिया जमातीची आहेत.

१४.दुग्धव्यवसाय, लघुउद्योग, नोकरी यामध्ये गुंतलेल्या कुटूंबांची संख्या नगण्य आहे.

१५. तीनही जमातीचे सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये ७००० इतके आढळले.

१६. शेतमजुरी या व्यवसायापासून मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न रु.२००० ते ४००० इतके आढळले.

१७. शेतीपासून मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न रु.४००० ते ७००० इतके आढळले.

१८.रुपये ११०००/- इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा धरल्यास कातकरी, कोलाम व माडिया जमातीतील सुमारे ९४ टक्के कुटूंबे ही दारिद्रय रेषेखाली आहेत. व यामध्ये कातकरी जमातीचा क्रम सर्वात वरचा (९७%)आहे.

१९. तीनही आदिम जमातींच्या कुटुंबांचा कल घरगुती उपचाराकडे असल्याचा आढळून आला.

२०. 'भगता' कडे उपचारासाठी जाणाऱ्यांमध्ये माडिया जमातीतील कुटुंबे सर्वाधिक असून त्यानंतर कातकरी जमातीचा क्रम लागतो.

२१. वैदुकडे उपचारासाठी जाणाऱ्यांमध्ये, माडिया या जमातीतील कुटुंबे अन्य दोन जमातींच्या तुलनेत अधिक आहेत.

२२. प्रसुतीपूर्व सल्ला, प्रसुति व कुटुंब नियोजन या कारणांसाठी स्वेच्छेने दवाखान्यात जाणाऱ्यांचे प्रमाण कमी आढळले.

२३. अन्य दुर्धर आजारांच्या तुलनेत तिनही जमातीत आस्थमा व क्षयाचे रुग्ण जास्त आढळले.

२४. कातकरी जमातीत आस्थमा व लेप्रसीचे रुग्ण तर कोलाम व माडिया जमातीत आस्थमा व क्षयाचे रुग्ण जास्त आढळले.

२५. अन्य दोन जमातींच्या तुलनेत लेप्रसीचे रुग्ण

कातकरी जमातीमध्ये, आस्थमाचे रुग्ण कोलाम जमातीत तर क्षयाचे रुग्ण माडिया जमातीत जास्त आढळले.

२६. आदिम जमातींमध्ये उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचे प्रमाण नगण्य आढळले.

२७. इयत्ता ४ थी नंतर पुढच्या इयत्तेत वा पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर 'घटत्या' स्वरुपाची असल्याचे आढळले. थोडक्यात शैक्षणिक गळतीचे प्रमाण जास्त आहे.

२८. पुरुषांपेक्षा स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण खुपच कमी आहे. उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांचे प्रमाण नगण्य आहे.

२९. कातकरी व माडिया जमातीत स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण खुपच कमी आहे.

३०. कातकरी जमातीत ३ ते १६ वयोगटातील मुलां-मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण खुपच कमी आहे.

३१. निव्वळ मुलींचा विचार करता, तीनही जमातीतील सर्वाधिक मुली या शाळेत न जाणाऱ्यांपैकी (५३%) आहेत. यामध्ये कातकरी व माडिया जमातीतील मुलींची संख्या निम्म्याने आहे.

३२. तीनही आदिम जमातींच्या सर्वेक्षित कुटुंबांपैकी ६५ टक्के कुटुंबांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतल्याचे दिसते.

३३. तीनही आदिम जमातींच्या ज्या कुटुंबांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला नाही त्यातील ८२ टक्के कुटुंबांना योजनांची माहिती नव्हती असे कारण सांगितले.

३४. तीनही आदिम जमातींच्या सर्वाधिक कुटुंबांनी शिक्षण विभाग व आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेतला असल्याचे आढळले.

३५. अन्य दोन जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीच्या कुटुंबांनी सर्वाधिक ग्रामीण विकास विभागाच्या योजनांचा तर माडिया जमातीतील कुटुंबांनी कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेतल्याचे दिसते.

३६.रोजगार व व्यवसायनिमित्त स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांमध्ये कातकरी जमातीतील कुटुंबे सर्वाधिक आहेत. त्यानंतर माडिया जमातीचा क्रम लागतो.

<u>शिफारशी</u>

१. साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी 'प्रौढ शिक्षण' योजना मोठ्या प्रमाणावर राबविणे आवश्यक आहे. स्त्रियांसाठी स्वतंत्र वर्ग घेऊन स्त्री-साक्षरतेवर भर देणे आवश्यक आहे.

२. झोपडी मध्ये राहणाऱ्या आदिम जमातींच्या कुटुंबांसाठी पक्क्या स्वरुपाची घरे देण्यासाठी 'इंदिरा आवास योजना' मोठ्या प्रमाणात राबविणे आवश्यक आहे.

३. भूमिहीन कुटुंबांची संख्या सर्वात जास्त असल्याने स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होऊ शकेल व चांगली मजुरी मिळेल अशी तरतूद शासनामार्फत होणे आवश्यक आहे.

४. आदिम जमातींकडे जिराईत शेतजमीनीचे प्रमाण जास्त असल्याने सदरील जमीनीस पाणीपुरवठा, सुधारित बियाणांचा पुरवठा व प्रगत औजारे व शेती प्रशिक्षण इ. बाबी पुरवून सदरील क्षेत्र बागाईत मध्ये रुपांतरीत होईल असा प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीस वाव मिळेल.

५. आदिम जमातींच्या कुटुंबांना विशेषतः कातकरी व कोलाम जमातींच्या कुटुंबांना

शासनाकडील अतिरिक्त जमीनींचे वाटप करुन त्यांना शेतीकडे वळविता येणे शक्य आहे.

६. शेती व शेतमजुरी व्यतिरिक्त, दुग्धव्यवसाय, छोटे व्यवसाय जसे मत्स्यव्यवसाय, सायकल दुरुस्ती, स्टोव्ह दुरुस्ती, विडी उद्योग, वन उद्योग, शेतीपुरक व्यवसाय इत्यादी आर्थिक उत्पन्न वाढविणाऱ्या व्यवसायांची आदिम जमातींच्या व्यक्तींना ओळख करुन देणे व त्यांना आर्थिक मदत देवून अशा स्वरुपाचे व्यवसाय करण्यास त्यांना प्रवृत्त करणे.

७. दारिद्रय रेषेखाली असलेल्या कुटुंबांची संख्या पाहता शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या जिल्हा ग्राम विकास यंत्रणेच्या (डी.आर.डी.ए.) योजना अधिक परिणामकारक राबविणे आवश्यक आहे.

८. आस्थमा, क्षय व लेप्रसीचे रुग्ण आदिम जमातीमध्ये आढळून येत असल्याने स्थानिक पातळीवर रोग निदानाची शिबीरे घेवून आजाराची लक्षणे व परिणाम या विषयांची ओळख करुन देवून परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

९. आदिम जमातींमध्ये शिक्षणाची गळती आढळून आलेली असल्याने यामध्ये सुधारणा होणे गरजेचे वाटते.

१०. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा फायदा बहुसंख्य कुटूंबांनी घेतला असून, अजूनही या योजनांचा स्थानिक पातळीवर प्रचार होणे आवश्यक आहे. भाषेचा प्रश्न उद्भवत असेल तर स्थानिक भाषेमधून योजनांचा प्रचार करणे गरजेचे आहे. तसेच कृषी व ग्रामीण विकासांच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ आदिवासी लाभार्थींकडून कसा घेतला जाईल याची उपाययोजना स्थानिक पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक वाटते.

११. आदिम जमातींच्या कुटूंबांना ओळखपत्रे देवून त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा फायदा थेट मिळवून द्यावा.

१२. नजिकच्या वनक्षेत्रामध्ये स्थानिक आदिम जमातीच्या मजूरांना रोजगार उपलब्ध होईल, अशा पध्दतीच्या योजना वन खात्याने मंजूर करुन स्थानिक आदिवासींना आर्थिक आधार द्यावा. यामध्ये पडीक वनक्षेत्रावर रोपे लावण्यासाठी वनक्षेत्र करार पध्दतीवर उपलब्ध करुन देणे, वनक्षेत्रावर औषधी वनस्पती/अन्य वनस्पती लावण्यासाठी आदिम जमातींना कंत्राटी पध्दतीने ठेके देणे इ त्यादी.

संदर्भ :

१) *भारतीय जनगणना मालिका - १९६१, १९७१, १९८१.*

२) *बेंचमार्क सर्व्हे, सांख्यिकी मालिका क्र. ३*

महाराष्ट्र शासनातर्फे आदिवासींसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना झालेल्या लाभासंबंधी थोडक्यात गोषवारा

* श्री.प्रभाकर कासेकर

उजाड माळरानाचं आदिवासी दांपत्याने केलं नंदनवन-

ठाणे जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यातील खोच फुलांची वाडी येथे पिंजाळ नदीच्या काठावरील उजाड माळरानावर विविध प्रकारच्या फळाफुलांनी शेती करुन नंदनवन निर्माण करण्याची किमया श्री.महादेव अर्जुन निकम या आदिवासी दांपत्याने केली आहे. आंबा, नारळ, चिकू, पेरु, केळी, पपई यासारख्या फळ बागायतयीबरोबर गहू आणि उसाचे पीक घेण्यातही ते यशस्वी झाले असून आदर्श शेतकरी म्हणून ठाणे जिल्हा परिषदेकडून त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

मोखाडा आदिवासी भागातील खोच-फुलांची वाडी येथील रहिवासी असलेले श्री.महादेव अर्जुन निकम यांनी सुमारे पंचवीस वर्षे पोलीस दलात नोकरी केली आणि निवृत्तीनंतर काय हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी १९८७ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेऊन आपल्या एक हेक्टर ओसाड आणि डोंगरउताराच्या जमिनीत फलोद्यान उभारण्याचा निर्णय घेतला.

शंभर टक्के अनुदानावर वीजपंप -

खोच धरणामुळे जवळच्या पिंजाळ नदीला भरपूर बारमाही पाणी असते. श्री.महादेव निकम यांची पत्नी सौ.ताराबाई यांनाही शेतीत कष्ट करण्याची जिद्द होती. १९८७ मध्ये त्यांनी आदिवासी विकास विभागाकडून १०० टक्के अनुदानावर तीन अश्वशक्तीचा विद्युतपंप मिळविला

---

* माहिती सहाय्यक, प्रकर्षित प्रसिध्दी कक्ष, जव्हार, जि.ठाणे

यशकथा :-

केळीची लागवड -

एक हेक्टरच्या डोंगरउताराच्या जमिनीत ते पूर्वी नागली-वरईचे तुटपुंजे उत्पन्न काढीत. त्यांनी स्वतः श्रम करुन संपूर्ण जमीन समपातळीत आणली. जून,१९८८ मध्ये त्यांनी 'हरिसाल' जातीची एक हजार केळीची रोप आणून लावली. वीजपंपामुळे भरपूर पाणी मिळाले आणि त्यांना वर्षभरात केळीचे भरघोस उत्पादन मिळू लागले. दिडशे रु.क्विंटल दराने केळीची विक्री होऊ लागली.

फलोद्यानाची उभारणी -

निकम दांपत्यांचा फलोद्यानातील आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी सन १९८८-८९ मध्ये म्हणजे रोजगार हमीतून शंभर टक्के अनुदानाची योजना सुरु होण्यापूर्वी आधी दोन वर्षे फलोद्यान विभागाकडून पन्नास टक्केअनुदानावर १६ हजार रु.कर्ज घेतले आणि नारळ, २५, चिकू, २५, आंबा कलमे ५० याप्रमाणे फळझाडे रोपे/कलमे घोलवडच्या शासकीय नर्सरीतून आणून लागवड केली. जोडीला विविध प्रकाराचा भाजीपाला, उन्हाळी काकडी वगैरे विविध प्रकारच्या लागवडीची भर घातली. फळबागायतीतून आणि भाजीपाला उत्पादनातून त्यांना चांगले उत्पन्न मिळू लागले असून गांवात त्यांचे हे उत्पादन विक्री होऊ लागले आहे. जव्हार मोखाड्याची बाजारपेठही त्यांना उपलब्ध आहे. श्रमदेवता प्रसन्न झाल्याने आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन सेवानिवृत्तीनंतर काय हा प्रश्न त्यांच्या दूरदृष्टीमुळे योग्यवेळी सुटला आहे.

हिरवेगार नंदनवन -

निकम दांपत्याला वीजपंपाबरोबर आदिवासी विकास विभागाकडून शंभर फुटाचे पी.व्ही.सी.पाईप मिळाले होते. आणखी लागणारे पाईप त्यांनी स्वतः खरेदी करुन एक हेक्टरच्या संपूर्ण बागायतीमध्ये पाईप-लाईन टाकून सिंचनाची शास्त्रशुध्द सुविधा वाढविली. शेतीमध्ये रोज नवनवीन प्रयोग आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब यामुळे आज फुलांच्या वाडीत फळाफुलांनी आणि केळी पपईच्या बागायतींनी भरलेले हिरवेगार नंदनवन येथे उभे राहिले आहे. केशर आंब्याची शेंडा कलमे ते स्वतः तयार करुन आंबा लागवडीत दरवर्षी भर घालीत आहेत.

गह् लागवडीचा उपक्रम-

कोकणात गह् होत नाही, हा समज निकम दांपत्याने खोटा ठरविला आहे. मोखाडा तालुका पंचायत समितीकडून एच.डी.२१८९ या जातीचे गव्हाचे बियाणे त्यांना मिळाले आणि गेली दहा वर्षे ते गव्हाचे यशस्वी उत्पादन घेत आहेत. ३० किलो गव्हाच्या बियांणांची पेरणी करुन ते दरवर्षी सुमारे साडेतीनशे किलो गव्हांचे उत्पादन घेतात आणि स्वतःच्या कुटुंबांची गरज भागवितात.

उसाची यशस्वी लागवड -

पाण्याची भरपूर सोय असल्याने गतवर्षीपासून निकम दांपत्याने ऊस लागवडीचा आणखी एक नवीन उपक्रम हाती घेऊन यशस्वी केला असून त्याची गांवातच किरकोळीने विक्री होऊन आर्थिक उत्पन्नात भर पडत आहे.

सेवानिवृत्तीनंतरचे सुखी जीवन

विक्रमगडचे कै.कोरे नामक शेतकऱ्यांनी आपणास फलोद्यानाची प्रेरणा दिली आणि श्रमदेवतेची पूजा करुन आपण एकेकाळच्या ओसाड माळरानावर फलोद्यान उभे करु शकलो, असे ते म्हणतात. ठाणे जिल्हा परिषदेने सन १९९३-९४ साली सौ.ताराबाई महादेव निकम यांचा आदर्श शेतकरी म्हणून गौरव करुन त्यांना प्रोत्साहन दिले. आदिवासी विकास विभागानेही विद्युत पंप व पाईपलाईन शंभर टक्के अनुदानावर देऊन सिंचनाची समस्या सोडविली. त्यामुळेच आपण शासकीय सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सुखाने आणि समाधानाने जगत आहोत.

खोच धरणामुळे पिंजाळ नदीला भरपूर पाणी आहे. धरणाच्या खालील क्षेत्रातील जमीन ओलीताखाली आणण्यास भरपूर वाव आहे. इतर शेतकरी बांधवांनीही भूमातेची सेवा करुन उन्हाळी शेती, भाजीपाला आणि फलोद्याने वाढविली तर त्यांना स्वयंरोजगारासाठी स्थलांतर करावे लागणार नाही, असे निकम दांपत्याने आपल्या कृतीतून सिध्द करुन दाखविले आहे.

आखर गांवात आदिवासीनी आणली समृध्दी -

महात्मा गांधीनी व्यसनमुक्त समाजाबरोबरच समृध्द खेड्यांचे स्वप्न पाहिले होते. ठाणे जिल्ह्यातील जव्हार सारख्या आदिवासी भागात अनेक खेड्यांमध्ये महात्माजींचे हे स्वप्न बहुतांशी साकार झाल्याचे सुखद दृश्य दिसू लागले आहे. फळ बागायती आणि स्वयंरोजगाराच्या विविध सुविधामुळे जव्हार तालुक्यातील आखर गांवातही आदिवासींनी स्वयंरोजगारासाठीचे स्थलांतर

थांबवून गांवात समृध्दी आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. अनेक आदिवासी आता बागायतदार झाले आहेत. या आखर गांवच्या विकासाची ही यशोगाथा.

जव्हार तालुक्यातील आखर हे सुमारे एक हजार लोकवस्तीचे आदिवासींचे गांव. अज्ञान, अंधश्रध्दा, व्यसनाधिनता आणि निरक्षरता यामुळे गांव पूर्णपणे मागासलेले होते. पावसाळ्यात थोडीफार शेती केल्यानंतर सगळे आदिवासी बांधव कुटुंबासहित रोजीरोटीसाठी गांवाबाहेर जायचे. संपूर्ण गांव ओस पडायचे. परंतू आज ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे ती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणि बायफ या स्वयंसेवी संस्थेने या गांवात स्वयंरोजगाराच्या निर्मितीसाठी हाती घेतलेल्या ठोस उपक्रमांमुळे.

आदिवासी बागायतदार बनले -

आखर गांवात १०२ आदिवासी कुटुंबे असून कातकरी कुटुंबाची वस्ती या गांवात बहुतांश आहे. बायफने या गांवात 'वाडी' प्रकल्पांतर्गत आंबा लागवडीची योजना राबवून त्याचा ६३ कुटुंबांना लाभ दिला. या प्रत्येक कुटुंबाने प्रत्येकी एक एकर क्षेत्रात २० आंबे, ३० काजू, १०, पेरु अशी फळझाड लागवड आणि त्याच्या जोडीस ८०० वनीकरण रोपांची लागवड केली. जव्हारच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातर्फे सिंचनासाठी पाण्याची सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी २३ आदिवासींना शंभर टक्के अनुदानातून डिझेल पंप आणि पाईप लाईन उपलब्ध करुन दिली. त्यामुळे आज आखर गांवात एकेकाळचे रोजगारासाठी वणवण करणारे अनेक आदिवासी बागायतदार बनले आहेत.

बागायतदाराचे गांव -

फळझाड लागवडीतून मिळालेल्या आत्मविश्वासतून आणि सिंचनाच्या सुविधांमुळे हे आदिवासी बांधव फलोद्यानाबरोबर उन्हाळी भात, भाजीपाला, गह् लागवड, कांदा, कलिंगड लागवड यासारखी रोखीची पिके घेण्यासाठी प्रवृत्त झाले. जव्हारची बाजारपेठ या उत्पादनासाठी उपलब्ध झाली आणि चार पैसे खिशात खुळखुळू लागले. त्यातून कुटुंबांच्या गरजाबरोबर विकासाच्या नव्या योजना आकार घेऊ लागल्या आहेत. डिझेल पंपाच्या जागी आता विद्युत पंप येऊ लागले आहेत. उच्च जीवनमान जगण्याची संधी त्यांना प्राप्त झाल्याने अनारोग्य, कुपोषण यासारख्या समस्या दूर होऊन एकेकाळी कॉलराग्रस्त म्हणून ओळखले जाणारे

आखर गांव आता विकासाकडे वाटचाल करणारे बागायतदारांचे प्रगतीशील गांव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

आखर गांवचे सित्या बेंड्या पवार, रामू नवशा वाघ यांचेसारखे अनेक कातकरी एकेकाळी रोज गांव सोडून खडी फोडण्याच्या कामावर जायचे. वाडी प्रकल्पातून ते आंबा बागायतदार बनले असून कलिंगड, भाजीपाला, मिरची, कांदा, सुरण यासारखी भरघोस पिके आत्मविश्वासाने घेऊन गांवातच स्थिरावले आहेत. तर सोनू पांडू गावीत यांचेसारखे शेतकरी वाडी प्रकल्पाच्या आत्मविश्वासातून शंभर टक्के अनुदानाच्या रोजगार हमी योजनेतून आंबा, काजू, पेरु यांची नवीन लागवड करुन आपल्या बागायती वाढवित आहेत.

डिझेल इंजिन प्रशिक्षण -

आदिवासी शेतकऱ्यांना दिलेल्या डिझेल इंजिनाची दुरुस्ती तात्काळ गांवात व्हावी म्हणून बायफ संस्थेने गांवातील होतकरु मुलांना डिझेल इंजिन दुरुस्तीचे प्रशिक्षण देऊन तो प्रश्न सोडविला आहे. आज या गांवात ६ आदिवासी तरुण डिझेल दुरुस्तीसाठी प्रशिक्षित झाले आहेत.

भूमिहिनांचे काय ?

अल्पभूधारक आदिवासींचा वाडी प्रकल्पातून रोजगाराचा प्रश्न सुटला तरी गांवातील २५ भूमिहिन कुटुंबांचे काय ? हा प्रश्नही बायफने सोडविण्याचा निर्धार करुन चिमण्या कुवरा या कातकरी बांधवास लोहारकामाचे साहित्य आणि मावजी कमा गावीत व ईश्वर रामा घाटाळ या दोघांना सुतारकामाचे साहित्य देऊन त्यांना स्वयंरोजगार उभारण्याची संधी दिली. अशाच अन्य भूमिहिन आदिवासींना गाई व कोंबड्या देऊन त्यांना दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालनाचा स्वयंरोजगार देण्याची योजना आहे.

स्वयंसहायता गट -

आज आखर गांवात या लाभार्थी कुटुंबाचे स्वयंसहाय्यता गट निर्माण झाले असून आदिवासींच्या स्वयंरोजगाराच्या व कौटुंबिक गरजा त्यांच्या आर्थिक बचतीतून भागविल्या जात आहेत. श्री.पांडुरंग रामू चौधरी यांच्या प्रमुखात्वाखालील गांव कमिटी आखर गांवच्या

विकासाचा रथ गांवकऱ्यांच्या सहकार्याने प्रगतीपथावर नेत आहेत.

हरितक्रांतीचे प्रश्न -

बायफ या संस्थेने एवढ्यावरच न थांबता आखर गांवात महिलांसाठी २५ स्नानगृहे बांधून दिलेली आहेत. गांवात सार्वजनिक विहिर आणि गांवकऱ्यांच्या श्रमदानाने विहिरीजवळ पाण्याच्या टाक्या बांधून घेऊन गांवच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला आहे. आता आखर गांवात बायफ संस्थेने कमिशन ऑफ युरोपियन कमिटीच्या अर्थसहाय्यातून दोन लाखाचा बंधारा बांधून घेतला असून सुमारे २५ एकर क्षेत्राला सिंचनाची नवीन सुविधा उपलब्ध होणार आहे. सिंचनाच्या या वाढत्या सुविधाबरोबर आखर गांवात हरितक्रांतीला प्रोत्साहन मिळून गांव खऱ्या अर्थाने समृध्दीकडे वाटचाल करुन महात्मा गांधीचे समृध्द खेड्याचे स्वप्न निश्चितपणे साकार करणार आहे.

जव्हारच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाने प्रकल्प अधिकारी श्री.शिवाजीराव दुधवाडकर आदिवासी विकासाच्या या योजना राबविण्यासाठी जातीने लक्ष घालीत असून बायफचे स्थानिक अधिकारी श्री.सुधीर वागळे, श्री.गोखले व श्री.जे.जी.राडे या योजना प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी परिश्रम घेत आहेत. आखरच नव्हे तर जव्हार तालुक्यातील वाडी प्रकल्पातील हजारो कुटुंबे यामुळे आज दारिद्र्यावर मात करु शकली आहेत. त्यांचे रोजगारीसाठीचे स्थलांतर पूर्णपणे थांबले आहे.

❁❁❁❁❁❁

वारली लोकांत दगडी देवांची निर्मिती

*श्री.लहांगे माधव हिराजी,

सध्याच्या काळात विद्वान किंवा धनवान पुरुष माणूस मेलेला असेल तर त्याची स्मृती म्हणून दगडाचा, लाकडाचा, घडीव किंवा सोनाराकडे सोन्या-चांदीचा या धातूचा घडवलेला असा 'वीर' देव आदिवासी लोक शेतावर, बांधावर किंवा त्याच्या हिंडण्या-फिरण्याच्या जागेत घराच्या आजूबाजूला/त्याच्या घराशेजारी आंबा, उंबर, जांभ अठरुन नाही तर साग किंवा कोणत्याही मोठ्या झाडाखाली झाडांच्या बुंध्याजवळ बसवतात. वीराचे अनेक प्रकार आहेत. गारुडी वीर, गारुडी विद्या शिकलेला असतो. तो माणूस मरण पावला तर त्याची स्मृती म्हणून गारुडी वीर बसवतात. बंगाली वीर हा वीराचा दुसरा प्रकार होय. बंगाली विद्या शिकलेला माणूस मरण पावला की त्याची स्मृती म्हणून दगडाला शेंदूर लावून एखाद्या विशेष ठिकाणी बसवतात. त्याला बंगाली वीर असे म्हणतात. मालदर वीर हा वीर कमावलेल्या धनावर असतो किंवा गाडलेल्या जुन्या पैशावर बसतो. ह्या वीराचे असे असते की त्याने खूप धन कमावलेले असते. त्याच्या हयातीत त्याने बरेच पैसे सुध्दा कमावून तो श्रीमंत धनवार पुरुष बनलेला असतो. त्याने काही पैसे किंवा धन जमिनीत ठेवलेलेअसतात असा एखादा धनवान धनी म्हणून गांवात असतो व कुटुंबात त्याला फार मान असतो. असा कोणी धनवार माणूस मरण पावला की मरणानंतर त्याची स्मृती म्हणून त्याने गाडलेल्या धनावर (पैशावर) तो बसतो. म्हणून त्याने गाडलेल्या धनावर एका दगडाला शेंदूर लावून तो दगड त्या जागेवर त्याची स्मृती म्हणून बसवतात. त्याला माळदरवेजी वीर असे म्हणतात. ज्याच्याकडे जमीन नाही तो त्याच्या वडिलांना मरण पावल्यानंतर कोणाच्या दुसऱ्याच्या जमिनीत बसवू शकत नाही म्हणून तो आपले वडील मरण पावल्यानंतर त्याची स्मृती म्हणून तो सोनाराकडून तांब्याचा, पितळेचा किंवा चांदीचा, घडवून घेतो आणि त्याचे बिऱ्हाड जाईल तिकडे तो सोबत असतो. हा टोकराच्या टीपरीत किंवा मडक्यात बांधून ठेवलेला असतो. ह्या सर्व प्रकारच्या वीरांना त्याचे कुटुंबिय दरवर्षी

* रा.चाळके, तळावली, ता.जव्हार, जि.ठाणे

कोळीच्या देवाला दिवाळीच्या सणाला आणि होळीच्या सणाला, कोंबडा, नारळ, दारु घेऊन त्याला पांजी देतात व त्याला शेंदूर लावतात. आणि वेळप्रसंगी दु:खाच्या वेळेस, संकटाच्या वेळेस दु:ख, संकट टाळावे म्हणून त्याचा नवस घेतात व दु:ख, संकट टाळल्यावर त्याला कबूल केलेल्या वस्तु ठरलेल्या वेळेप्रमाणे त्याला पुरवतात व घेतलेला नवस (वचन) पूर्ण करतात. त्याला नवस फेडणे असे म्हणतात. वारली लोकांमध्ये 'अनेक गुणवान माणसे मरतात. त्यांच्या स्मृती म्हणून दगडाला शेंदूर लावून ठराविक ठिकाणी बसवलेले असतात. त्यांना वारली लोक देव असे म्हणतात. त्या देवांना कोणत्याही सणाच्या वेळी देवकामाच्या वेळी आठवणीने नारळ, कोंबडी वाहून अगरबत्ती लावून दारुची धार टाकतात व दरवर्षी आठवणीने त्याची पूजा करतात. त्या शेंदूर लावलेल्या दगडांना आदिवासी देव असे म्हणतात. असे अनेक प्रकारचे देव आपल्याला जंगलात बघायला मिळतात. अशा देवांना आदिवासी लोक दु:ख संकटाच्या वेळी धीर देण्यासाठी पाठीशी धरतात त्यांच्या नांवाने नवस घेतात. दु:ख, संकट टाळल्यावर ठरलेल्या वेळेप्रमाणे नवस फेडतात. अशाप्रकारे आदिवासी वारली लोक त्याची पूजापात्री करुन त्यांची घरबांध करतात. एखाद्या कुटुंबातील वीराचे विसल्यानंतर त्याची वेळच्या वेळी पूजा केली जात नाही. अशावेळी वीराचा चेडा बनतो. किंवा त्याला चेडा म्हणतात किंवा जेव्हा एखाद्याची जमीन दुसऱ्याने विकत घेऊन त्यांचे विस्मरण झाल्याने तो चेडा बनतो. असे आदिवासी वारली लोकांचे अनेक प्रकारच्या दगडांना शेंदूर लावून 'दगडी देव' बनवलेला असतो. असे देव निरनिराळ्या नांवाने ओळखले जातात. जसे वीर, हीखा, चेडा, बाटाचेडा, चोखाचेडा, तोरणी चेडा, मखरी चेडा, चक्रीचेडा, भातानचेडा, धनचेडा, मनचेडा, शिवचाचेडा, अकोली चेडा, भकाली चेडा, सैतानी चेडा, फलटणी चेडा,बरखदी चेडा, शिवसैनी चेडा, गुपीत चेडा, दपित चेडा, त्याच्यानंतर फीरीस्ता देव, गुपीत दगडी नवशी देव, मानशी नवशी देव, दागिन्या दगडी नवशी देव, कानदडी दगडी नवशी देव, माहरी दगडी नवशी देव, सरवरी दगडी नवशी देव, चालवणेचा दगडी नवशी देव, पाठवणेचा दगडी नवशी देव, बाल्हगणेचा दगडी नवशी देव, या सर्व देवांच्या आकृत्या दगडावर माणूसरुपी दाखवून हातात काठी व डोक्याला पगडी ठेवून दर्शवतात. निरनिराळ्या आकारात

शेंदूर लावून दर्शवितात व त्या नांवाने ओळखले जातात. त्यानंतर अजून काही देवदेवतांची निर्मिती झाली आहे.

तसेच काही नैसर्गिक देव व इतर दगडी देवसुध्दा दगडावर निरनिराळी शेंदराची चिन्हे देऊन दाखवता येतात. चारणी देव, घोडस्वार, कोहडा, गोधणीचेडा, गवळणी चेडा इत्यादी दगडी देवांची या लोकांनी निरनिराळ्या नांवानी निर्मिती केलेली आहे. जसे वाघोबा, गावदेव, गांवदेवी, जरीमरी इ.सामुदायिक देवांची सुध्दा त्यांनी निर्मिती केली. त्यांच्यामध्ये काही विधीत्मक जागरण सुध्दा त्या देवाच्या नांवाने सामुदायिक रितीने करतात. त्यामध्ये देवीचे जागरण तोरण देवाचे जागरण, खाली जागरण, बायांचे जागरण, गांवदेवीची साथ इ.समावेश होतो.

गांवदेवी -

गांवदेवीच्या निर्मितीच्या कथा अशी आहे की, ह्या पृथ्वीतलावर दैत्यावर म्हैशासूर नांवाचा दैत्य होता. तो त्याच्या भक्ती योगाने श्रेष्ठ झालेला होता आणि पृथ्वी तळावरल्या देवांना त्याने नानाप्रकारे त्रास दिला. एकावेळी नर देवांना रथामध्ये घालून बळीदान देण्यासाठी घेऊन चालला असताना रथामध्ये देवांना कोंबून त्यांच्यावर फडका झाकून नेत असताना त्या देवांनी आदिमाया आदिशक्तीची प्रार्थना केली की हे देवी ह्या राक्षसाच्या संकटातून आम्हाला वाचीव. जर ह्या संकटातून तू आम्हाला वाचवलेस तर आम्ही तुझी स्थापना करुन अखंड सेवा करु. हया संकटात सापडलेल्या मानवी देवांची ही प्रार्थना ऐकून ही देवी म्हतारीचे रुप घेऊन म्हैशासूराच्या रथाच्या आडवी गेली. ती एका डोंगराच्या खिंडीत रस्त्यावर शंभर वर्षाच्या म्हातारीचे रुप घेऊन एक फाटके लुगड्याने संपूर्ण शरीर झाकून रस्त्यात पडून राहिली. त्या फाटक्या गोधडीच्या आतमध्ये भाला, तलवार, गधा, शंख, चक्र अशी आयुध आणि वाहन वाघ हे दडवून ठेवलेले होते. रेडा जुंपलेला म्हैशासूराचा रथ जवळ जवळ येताच म्हैशासूर तिला म्हणाला, ये म्हातारे रस्त्याच्या बाजूला हो . नाहीतर माझ्या रथाखाली तू चिरडून मरुन जाशील. म्हातारीचे रुप घेतलेली देवी दैत्याला म्हणाली मला म्हाताऱ्या माणसाला मारुन पाप वाढवू नकोस. मला उठवत नाही. चालवत नाही. तरी तू खाली उतरुन मला उचलून बाजूला ठेव आणि तुझा रथ घेऊन पुढे जा. म्हैशासूर रथातून खाली उतरताच देवीने म्हातारीचे रुप बदलून खऱ्या देवीच्या रुपात प्रगट झाली आणि

म्हैशासूराबरोबर लढू लागली. त्याचप्रमाणे तिचे वाहन वाघ म्हैशासूराचे वाहन रेड्यावर तुटून पडला. वाघाने रेड्याला मारले व देवीने म्हैशासूराला मारले व त्याच्या रथात असलेल्या लोकांना बळी देण्याच्या संकटातून सोडविले. तेव्हापासून जगदंबेला लोकांनी गांवदेवी म्हणून स्थापना केली. तसेच म्हैशाला मारणारा वाघ हे देवीच्या शेजारी त्याची स्थापना करण्यात आली. म्हणून प्रत्येक ठिकाणी आदिवासी वारली लोकांनी गांवदेवी आणि वाघोबाची स्थापना केली आणि तेव्हापासून वाघाला वाघोबा देव मानून त्याची लोक पूजा करु लागले. देवाला त्याच्या दुःख संकटकाळी आधार मानू लागले व पावसाळ्याच्या वेळेस त्याची पूजा करुन त्याला देखरेख करण्यासाठी प्रवृत्त करतात आणि त्याला आवर्जून असे सांगतात की, हे वाघोबा देवा तू जंगलाचा राजा आहेस. तू आम्हाला पाव आणि सगळ्यांची चार महिन्याची रात्र आलेली आहे तर आमची मूलंबाळं, गुरंढोरं तुझ्या राज्यात किड्या काट्यात दिवसरात्र रानावनात फिरणार आहेत त्यावर तू नजर ठेव आणि त्यांची राखण कर. येत्या मगशीराला तुला बोकडाची चारा पांजी देन. असा नवस बोलून मार्गीशिश महिन्यात सोमवारची रात्र जागरण करुन मंगळवारी त्याला बकऱ्याची जारा पांजी देतात व दिलेले वचन लोक पूर्ण करतात. म्हणजेच गांव देवाची पूजा करतात.

हिरवा -

हिरवा देव म्हणजे आगीत जळत नाही, वाऱ्याने सुकत नाही. पाण्याने भिजत नाही, पथराने तुटत फुटत नाही. तो हिरवाच राहतो म्हणून त्याला हिरवा देव असे म्हणतात. हा हिरवा देव मुख्यतः मोरांच्या पिसांचा बांधलेला असतो. म्हणून तो रंगनिपण हिरव्या रंगाचा असतो म्हणून त्याला हिरवा देव किंवा हिरोबा असे सुध्दा म्हणतात.

खईस मुंज्या-

खईस किंवा मुंज्या हा आदिवासी वारली लोकांत एक सैतानी देवाचा प्रकार आहे. मुंज्या/खईस हे आदिवासीतील अविवाहित आणि पंचवीस ते पन्नास वयोगटातील अविवाहित पुरुष मृत्यु पावलेला असतो आणि त्याची स्त्रीसंग कामवासना अपूरी राहिलेली असते. तसेच कुस्ती खेळण्याची वासना सुध्दा त्याची अपूरी राहिलेली असते, त्या वासनेपोटी त्याचा जीवात्मा (पिशाच्च) रुपाने त्या गांवाच्या स्मशानाशेजारी किंवा गांवाच्या शेजारी असलेल्या पिंपळ, बेहडा (बेहल) सादडा, मोठा ऐन अशा मोठया उंच

आणि जुनाट झाडावर तो आपली वस्ती धरुन राहिलेला असतो. आणि अमावास्या, पौर्णिमा ह्या दिवशी त्या भागात भ्रमण करुन त्याच्या मार्गात कोणी स्त्री-पुरुष सापडला तर रात्री पुरुषाबरोबर कुस्ती घेणे आणि सापडली तर तिच्यावर बलात्कारीक संभोग करुन कामवासना पूर्ण करणे व अशा त्याच्या तावडीत सापडलेल्या माणसांना मरेपर्यंत त्रास देत असतो. परंतू अशा संकटापासून बचाव करण्यासाठी आदिवासी वारली समाजामध्ये काही माणसांकडे मंत्राद्वारे काही अद्‌भूत शक्तींना एकत्र करण्याची मांत्रिक शक्ती असते. अशा मांत्रिक शक्तीने दुःख बरे करणाऱ्या माणसाला आदिवासी वारली भाषेमध्ये 'भगत' किंवा 'भगत्या' असे म्हणतात. त्याच्याकडे असलेल्या शक्तीयोगे आदिवासी वारली भगत त्या मुंज्या खैसाचा बंदोबस्त करतात व आपल्या आदिवासी कुटुंबांचे कार्य करतरत. खईस मुंज्या दोन प्रकारचे असतात. एक चोखा खईस दुसरा बाटा खईस.

कालमेघ / बहरम-

आदिवासीमध्ये हिरवा, हुमायू हे कुलदैवत आहेत. त्याचप्रमाणे काही घराण्याचे कौटुंबिक कुलदैवत 'बहरम देव' आहे. बहरम देव म्हणजे एका मोठ्या बांबूच्या दांड्याला (काठीला) मोर पिसाऱ्यंचे झाट बांधलेले असतात. ते मोर पिसाऱ्याचे झाट कुटुंबांच्या रुढीप्रमाणे काठीला बांधलेले असतात. तसेच पाच गुच्छ, सात गुच्छ, बारा गुच्छ असे जे मोर पिसाऱ्याचे गुच्छ एका मोठ्या बांबूच्या काठीला बांधलेले असतात त्या काठीला बहरम देव किंवा बहरमाची काठी असे म्हणतात. बहरमाची काठी म्हणजेच बहरम देव होय. ह्या कुलदैवताला आगोटची पाजी, सिमग्याची पाजी, दिवाळीची पाजी, आणि लग्नाची पाजी त्याला मुकाट्याने देत असतात. दिवाळीची पाजी देतात. त्यासाठी दिवाळबारशी पासून काठीची गुढी उभारुन ढोल, तारपा ही वाद्य वाजवून अंगात वारी आणतात व वारी घेऊन बहरमाची काठी गांवभर किंवा गांवाच्या बाहेर पाच गांव फिरवून आणतात. ज्या वेळेस बहरमाची काठी ज्याच्या दारात येते, ज्यावेळेस त्या घरची मालकीणबाई शेणाचा सडा सारवून पिठाचा देव चौक भरते आणि पिठाच्या चौकावर शेंदूर, कुंकू अबिराचा चौक भरला जातो. त्यावर दडी म्हणजे बसण्याचा घाट ठेवून त्या पाटावर बहरमाची काठी उभी केली जाते. मग घरमालकीणबाई काठीच्या भगताचे पाय धरते आणि डोक्यावर पदराचा बोखडा घेऊन पंच आरती देवाला ओवाळते. ह्याप्रमाणे घरोघर

बहरमाच्या काठीची पूजा केली जाते. त्याचबरोबर धान्य, भात, चवळे, तांदूळ, फुले, काकडी, करवंदे, रोख पैसे दक्षिणा म्हणून दिले जातात. अशाप्रकारे बहरमदेवाची दिवाळीला पूजा केली जाते. मग संकटाच्या वेळी या देवाला नवस पुरवून ते संकट टाळतात, अशी आदिवासींची श्रध्दा आहे.हया देवाचे मंदिर नगरचा राजा बहरम म्हणून बहरमाचा मंदिर नगरमध्ये आहे.

हुमाय देवीचा सलद-

हुमाय देवी म्हणजे वारली लोकांची लक्ष्मी मानली जाते. ह्यामध्ये वारल्याचे काही प्रकार आहेत. काजकरी (विरसाली) वारली व मांडवली वारली या लोकांमध्ये ह्या देवीला फार मोठे स्थान व मान आहे. म्हणून हे लोक त्या देवीला आपली लक्ष्मी मानतात. त्याचा एक समज आहे की, कन्सरी, गावतरी पैसा, धन आणि इतर धान्य ही वारली लोकांना हीमाय देवी देते, अशी आदिवासी वारली लोकांची श्रध्दा आहे. तिला गोल टोपल्यामध्ये कलाकृतीच्या झाकणाच्या टोपलीत ठेवतात. त्या टोपलीला सलद असे म्हणतात. सलदात तांदूळ ठेवून त्यात मध्यभागी सोनाराकडून तांब्याची किंवा पितळेची मूर्ती घडवलेली हुमाय देवीची मूर्ती ठेवतात. उजव्या बाजूला कन्सरी बाळाची मूर्ती ठेवलेली असते. पाच बैलांचा तांडा त्याला राखण करणारे हाक्या, बोंब्या हे दोन वंजारी असतात. रानडुकराची कुच्छे, साठ चांदीचे जुने रुपये आणि तांब्याचा डिक्या, सुपाऱ्या सलदात ठेवलेल्या असतात. ह्या देवीची पूजा आदिवासी वारली लोक आगोटचे कोळी भाजी खातात तेव्हा लावून करतात. तसेच होळीला दिवा लावून करतात. मात्र दिवाळबारशींना त्या देवांचा पसारा घालून गोमुत्राने, दूधाने किंवा पाल्याने त्या सर्व देवांना आंघोळी घालतात व त्यांना शेंदराचा लेप देतात. जेव्हा ह्या देवांना शेंदाराचा लेप चढवतात तेव्हा तारपी ही वाद्य वाजवून कोंबडी नारळ काकडी, नवीन धान्याचा भाकरी, चवळे, करांदे ही नैवैद्य दाखवून मखमलीची फुले वाहन त्यांची पूजा करतात आणि त्या दिवसापासून जो माणूस त्या देवांची पाल करतो त्याच्या हातून सर्व कुटुंबियांना शिजविलेले चवळे करांदे व भाकरी, काकडी हे सर्व कुटुंबांतील

माणसे एकत्र बसून एकमेकांना हातावर देऊन खातात.

नारायणाचा सलद-

नारायणाचा सलद इशरदेव, कमलापत राणी, बरभादेव, रेघापत राणी, महादेव, गंगागौरी अशा तीन देवांच्या जोडप्यांच्या मूर्ती शेंदराने झाकलेल्या असतात, मध्यभागी नाराणाची पिंडी असते. त्याचप्रमाणे हे देव असतात त्यांच्या मूर्ती साफ करण्यासाठी रान डुकरांच्या केसांचे कुंचले असतात. तसेच टाळजोड, शंख तसेच गुरांच्या तोंडातून बाहेर आलेले वगोळे इत्यादी त्या सलगदात ठेवलेले असतात. नाराणाचा देवांचा नवस घेताना भोयी भगत तो सलद उचलून देवांचा कौल घेत असतो. जर देव पावणार असेल तर सलद जमिनीला घट्ट चिकटून बसतो. भगताने कितीही ताकद लावली तरी तो त्याला उचलत नसतो. नाराणाची मुख्य पूजा माहिबिजेला त्याचा पसारा घालून रात्रभर कांबडी नाच नाचून काठा वाद्यावर नाराणाची गाणी गाऊन माहिबिज हा नाराणाचा उत्सव करुन वारली लोक त्याची मुख्य पूजा करतात.

❋❋❋❋❋

इतर रोजंदारीची कामे ते करतात. या कामाच्या वेळी वेगवेगळ्या गांवातील आदिवासींशी त्यांचे संपर्क येतात. युवक युवतीची अशाच कुठल्यातरी कामाच्या वेळी ओळख होते व त्यांच्या पसंतीनुसार प्रेमसंबंध जोडले जातात. या प्रेमातूनच ते आपला जीवनसाथी निवडून लग्न करण्याचा निर्णय घेतात. या प्रेमसंबंधाची माहिती त्यांच्या मित्रमंडळींना असू शकते. पण शक्यतोवर घरातील किंवा समाजातील वरिष्ठ मंडळींना त्याची खबर नसते. लग्नाचा निर्णय झाल्यानंतर हे प्रेमी युगल घुंगरु बाजाराची वाट पाहतात. घुंगरु बाजारात जाण्यासाठी युवतींना पूर्णपणे मोकळीक असते. घरातील मंडळी रोकठोक करीत नाहीत. या बाजारात आल्यानंतर ठरल्याप्रमाणे हे प्रेमी युगल भेटतात व तेथून पळून जातात. बाहेरच कोणत्याही नातेवाईकांकडे किंवा आप्तेष्टांकडे महिना पंधरा दिवस राहतात. दोघांच्याही घरी ही बातमी बाहेरुनच समजते व नाहीच समजली तरी घरातील मंडळी ही गोष्ट समजून घेतात. कारण अशाप्रकारे पळून जावून लग्न करणे ही त्यांची पूर्वीपासूनची परंपरा आहे.

महिना पंधरा दिवसानंतर हे युगुल परत घरी येतात किंवा घरच्यांना त्यांचा ठावठिकाणा समजला तर ते त्यांना घरी आणतात. त्यानंतर मुलाकडील व मुलीकडील वरिष्ठ मंडळी लग्नाची बोलणी करीतात. या लग्नामध्ये मुलाला, मुलीला हुंडा द्यावा लागतो. हुंडा म्हणून एक बैल, हजार-पाचशे रुपये व एक दोन पोते धान्य द्यावे लागते. यामध्ये मुलाच्या परिस्थितीनुसार थोडाफार बदल सुध्दा होतो. बोलणी पूर्ण झाल्यावर त्या दोघांचे पारंपारिक पध्दतीप्रमाणे लग्न लावले जाते. अशाप्रकारे त्यांच्या वैवाहिक जीवनाची सुखद सुरवात होते.

आदिवासींमध्ये पूर्वी मुलांची संख्या फार जास्त असायची. कुटुंब नियोजन हा प्रकार मुळीच नव्हता. तसे तर बिगर आदिवासींमध्ये सुध्दा कुटुंब नियोजन करीत नसतं. परंतू आदिवासी हे बऱ्याच काळपर्यंत आणि आजसुध्दा, " मुलं हे देवाची देणं आहेत, त्यामध्ये मनुष्याने ढवळाढवळ करु नये." या मताचे आहेत. मुलगा व मुलगी वयात आले की लगेच ते लग्नासाठी मोकळे असायचे. पूर्वी आदिवासींमध्ये मुलींचे लग्नाचे वय १३ ते १४ वर्ष व मुलाचे १४ ते १६ वर्ष असे होते. लग्न लवकर झाल्यामुळे नियोजन शून्य असल्यामुळे प्रत्येक कुटुंबात १० ते १५ असेच अशीच असायची. या सर्वांचे लग्न करायचे म्हणजे

प्रत्येकी वेळी शेतीचे व इतर उदरनिर्वाहाचे काम बाजूला ठेवावे लागते. त्यातही आदिवासींची एकदम बिकट परिस्थिती असल्यामुळे या मुलांच्या लग्नाकडे लक्ष दिले जात नसे. मुले वयात आली की स्वतःच जीवनसाथीची निवड करीत व पळून जावून लग्न करीत. त्यासाठी थाट्यांचा घुंगरु बाजार हे त्यांना योग्य वेळ आणि ठिकाण सिध्द झाले. अशाप्रकारे कोरकुमध्ये घुंगरु बाजाराला समाजाची अलिखित मान्यताच मिळाली व ही पध्दत त्यांच्यामध्ये रुढ झाली असे या मागील कारण असल्याची माहिती गांवामधील प्रौढ मंडळीकडून मिळते.

आदिवासींची ही पळून जावून लग्न करण्याची पध्दत आता बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे. कारण आदिवासींचा विकास करण्यासाठी बऱ्याच योजना सुरु केल्या आहेत. त्याचबरोबर विवाह वयोमर्यादेचा कायदा, कुटुंब नियोजन, शैक्षणिक समतोल त्यांचे फायदे या सर्वांचा शासकीय बिगर शासकीय संस्था यांनी बराच प्रचार व प्रसार चालविला आहे. त्यामुळे, थोडा का होईना आदिवासींच्या पारंपारिक अंधश्रध्दा दूर होऊन काही प्रमाणात त्यांच्यामध्ये बदल दिसून येत आहे. बिगर आदिवासी प्रमाणेच आदिवासींमध्ये सुध्दा ठरवून लग्न करायची पध्दत रुढ होत आहे. परंतू त्यामुळे घुंगरु बाजाराचे महत्व कमी झालेले नाही. आजही तेवढीच गर्दी व तेवढाच उत्साह या बाजारात दिसतो.

❁❁❁❁❁

आदिवासी युवक-युवतींना देशसेवेची संधी देणारे जव्हारचे पोलीस-सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र

* श्री.प्रभाकर कासेकर

आदिवासी युवक-युवतींना सैन्यदल, पोलीस दल तसेच राज्य व केंद्रीय पोलीस दलात भरती करुन देशसेवेची संधी उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत ठाणे जिल्ह्यातील जव्हार या आदिवासी भागात पोलीस-सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. गेल्या दहा वर्षात या केंद्राचे हजारो आदिवासी युवक आणि युवतींना पोलीस आणि सैन्यदलात भरती होण्यास मदत केली आहे. या भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राच्या वाटचालीचा हा मागोवा.

आदिवासी युवक-युवतींमध्ये पोलीस आणि सैन्यदलात भरती होण्यासाठी आवश्यक ती शारिरीक आणि बौध्दिक पात्रता निर्माण व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागातर्फे राज्यात अकोले, जि.अहमदनगर, नाशिक, नंदूरबार, धारणी, जि.अमरावती, किनवट, जि.नांदेड, गडचिरोली, देवरी, जि.भंडारा, घोडेगांव, जि.पुणे आणि जव्हार, जि.ठाणे अशा एकूण नऊ ठिकाणी पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरु केली आहेत. ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथील भरतीपूर्व केंद्र सन १९९० मध्ये सुरु झाले असून या केंद्राने गेल्या दहा वर्षात सुमारे ११०० आदिवासी युवक-युवतींना प्रशिक्षित केले असून त्यातील हजारो उमेदवार पोलीस आणि सैन्यदलात भरती झाले आहेत.

जव्हारचे प्रशिक्षण केंद्र

जव्हार येथील जुना राजवाडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वास्तुमध्ये हे भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सन १९९० पासून कार्यान्वित आहे. चार महिने मुदतीचा हा प्रशिक्षण वर्ग असून दरवर्षी तीन तुकड्या म्हणजे सरासरी १५० उमेदवार येथून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडतात. प्रत्येक सत्रात ५० उमेदवारांना प्रवेश मिळतो.

* माहिती सहाय्यक, प्रकर्षित प्रसिध्दी कक्ष, जव्हार, जि.ठाणे

प्रशिक्षण केंद्राचे सुयश

सन १९९५-९६ पासून या केंद्रात प्रथमच आदिवासी मुला-मुलींसाठी स्वतंत्र भरतीपूर्व प्रशिक्षण सत्राचा उपक्रम सुरु करण्यात आला. त्यापूर्वी केवळ आदिवासी मुलांनाच येथे प्रशिक्षणाची सुविधा होती. सन १९९०-९१ ते १९९९-२००० या गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत जव्हारच्या या केंद्रात ९३३ आदिवासी युवक आणि १३३ आदिवासी युवती अशा एकूण १०६७ आदिवासी उमेदवारांना पोलीस सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात आले. यापैकी बहुसंख्य आदिवासी उमेदवारांना पोलीस व सैन्यदलात नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. विशेष म्हणजे प्रशिक्षित झालेल्या १३३ आदिवासी युवतीपैकी ८८ युवती पोलीस दलात भरती झाल्या आहेत. जानेवारी,२००१ मध्ये बृहन्मुंबई पोलीस दलात शिपाई पदावर भरती झालेल्या या केंद्राच्या ४८ उमेदवारांमध्ये २५ आदिवासी युवतींचा समावेश आहे. प्रशिक्षण घेतलेले व भरती झालेले बहुतेक उमेदवार ठाणे जिल्ह्यातीलच आहेत.

भरतीसाठी पात्रता -

पोलीस-सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता पूर्वी आठवी होती. नंतर दहावी अशी होती. ती सन १९९०-२००० पासून बारावी पास अशी करण्यात आलेली आहे. वयोमर्यादा १८ ते ३० वर्षे आवश्यक असते. युवकांसाठी शारिरीक पात्रता उंची १६७ से.मी. वजन ५० किलो आणि छाती ७९-८२ से.मी. तर युवतींसाठी उंची १५५ से.मी.वजन,४८ किलो अशी आवश्यक असते. चार महिने मुदतीच्या या प्रशिक्षण सत्रात शासन प्रत्येक उमेदवारावर दोन हजार रु.खर्च करते आणि त्यातून त्यांना निवास, भोजन, गणवेष आदि सुविधा मोफत दिल्या जातात.

प्रशिक्षणाचे स्वरुप -

जव्हार जुन्या राजवाड्यातील मैदानावर सकाळी ६.३० वा. पासून प्रशिक्षण सुरु होते. त्यामध्ये पी.टी.परेड, धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, बिनबार, दोरावरुन उंच चढणे (व्हर्टिकल रस्ता) यासारखे व्यायाम प्रकार आणि विविध खेळांचा या प्रशिक्षणात समावेश असतो. याखेरीज आठवड्यातून तीन वेळ डोंगरी व दुर्गम भागात २० ते २५ कि.मी.पर्यंत पायी प्रवासास नेले जाते. यातून प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन व साहसाचे प्रशिक्षणही दिले जाते. प्रशिक्षण वर्गात

बौध्दीक, सांस्कृतिक, सामाजिक आणि सामान्य ज्ञानावर आधारीत शैक्षणिक मार्गदर्शनही केले जाते.

केंद्राची प्रगतीपथावर वाटचाल -

सेनादलातून टेक्निशियन हवालदार म्हणून निवृत्त झालेले आणि जव्हार तालुक्यातील रायतळे गांवचे रहिवासी असलेले श्री.तुकाराम नाना सातपुते हे या भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे शिबिर प्रमुख म्हणून गेली १० वर्षे काम पाहत आहेत. जव्हारचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री.शिवाजीराव दुधवाडकर यांच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळे जव्हारचे हे प्रशिक्षण केंद्रे सातत्याने प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

भरतीची शंभर टक्के संधी -

प्रशिक्षित आदिवासी उमेदवारांना पोलीस व सैन्य दलात भरतीची शंभर टक्के संधी या प्रशिक्षण केंद्रामुळेच उपलब्ध होत आहे. विशेषतः प्रशिक्षित आदिवासी युवतींना पोलीस दलात तात्काळ नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. म्हणूनच या केंद्रात आदिवासी युवतींसाठी वर्षातून एक तरी स्वतंत्र प्रशिक्षण सत्र आयोजित केले जाते. आदिवासी युवकांबरोबरच युवतींनाही या प्रशिक्षणाच्या संधीचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने पुढे येण्याची गरज प्रकल्प अधिकारी श्री.दुधवाडकर यांनी व्यक्त केली आहे.

प्रशिक्षणावरील मेहनत-

आदिवासी उमेदवार विशेषतः आदिवासी मुलींच्या प्रशिक्षणासाठी येथे अधिक मेहनत घ्यावी लागते. आदिवासी मुली अबोल, लाजाळू असतात. समोरच्या व्यक्तींशी कसे बोलावे याचेही त्यांना फारसे ज्ञान नसते. धावण्याची त्यांना फारशी सवय नसते. या सर्व अडचणींवर मात करुन या केंद्रात आदिवासी युवतींना धीट बनवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला जातो. तर आदिवासी तरुणांच्या बाबतीत ते काटक असले तरी वजनात कमी आणि छातीमध्ये कमजोर असतात. अशा सर्व उणिवा दूर करुन घेण्यासाठी प्रशिक्षणावर विशेष भर दिला जातो आणि त्यांना पोलीस व सैन्यदलातील भरतीसाठी फीट बनविले जाते.

राज्यातील अग्रगण्य प्रशिक्षण केंद्रे-

जव्हारच्या पोलीस सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील आदिवासी मुली जशा पोलीस दलात भरती होत आहेत, त्याचप्रमाणे उच्च शिक्षण घेतलेल्या आदिवासी मुलींना आदिवासी मुलींच्या वसतिगृहाच्या अधिक्षिका

म्हणूनही नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यात प्रकल्प अधिकारी श्री.शिवाजीराव दुधवाडकर यांनी पुढाकार घेतला आहे. या केंद्रात प्रशिक्षण घेतलेल्या अशा १२ आदिवासी मुली आज जव्हार प्रकल्पातील आदिवासी मुलींच्या वसतिगृहामध्ये अधीक्षिका म्हणून चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. आदिवासी मुलींचे प्रशिक्षण अधिक चांगल्या प्रकारे व्हावे म्हणून त्यांच्या प्रशिक्षणाचा कालावधी चार महिन्याऐवजी सहा महिनेपर्यंत असण्याची गरज या केंद्राचे शिबिर प्रमुख श्री.सातपुते यांनी व्यक्त केली.

एका दशकाची वाटचाल पूर्ण करणारे जव्हारचे हे पोलीस-सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र आदिवासी उमेदवारांना रोजगारच नव्हें तर पोलीस व सैन्यदलात भरती होऊन देशसेवेची संधी प्राप्त करुन देणारे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य प्रशिक्षण केंद्र म्हणून आता सर्वांनाच परिचित झाले आहे. प्रकल्प अधिकारी श्री.दुधवाडकर यांचे या केंद्राच्या वाटचालीसाठी सातत्याने मार्गदर्शन लाभत असते.

❊❊❊❊❊

बाल विकासाच्या महत्वपूर्ण योजना

* श्री.रमेश बच्छाव

महिला आणि बालकांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र महिला व बालकल्याण विभाग कार्यान्वित केला असून या विभागातर्फे बालकांच्या विकासासाठी अनेक महत्वपूर्ण योजना राबविण्यात येतात. अशा काही ठळक योजनांची माहिती या लेखांत देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकासाच्या योजना राबविण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालय स्थापन केले आहे. या कार्यालयातर्फे महिला व बाल विकासाच्या विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनांचा लाभ घेण्यासाठी त्या योजना ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्याचा गट विकास अधिकारी व एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या यंत्रणेमार्फत प्रयत्न केला जातो. बालकल्याणाच्या अशा काही योजना पुढीलप्रमाणे आहेत.

बालगृहात प्रवेश -

बाल न्याय अधिनियम १९८६ च्या तरतूदीनुसार निरीक्षण गृहातील बाल न्यायालय व बालकल्याण मंडळ यांच्या आदेशानुसार मुला-मुलींना बालगृहात प्रवेश देण्यात येतो. या गृहांमध्ये मुले वयाच्या १८ वर्षापर्यंत व मुली वयाच्या ३० वर्षापर्यंत राहू शकतात. बालगृहामार्फत मुला-मुलींना संरक्षण, अन्न-वस्त्र, निवारा, शालेय शिक्षण, प्रशिक्षण व वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन त्यांचे नोकरी, व्यवसाय पालकांच्या ताब्यात देऊन व विवाहाद्वारा पुर्नवसन करण्यात येते. राज्यात शासनामार्फत कनिष्ठ,वरिष्ठ व विशेष बालगृहे असे एकूण ३२ गृहे चालविण्यात येतात. त्याचा १०० टक्के खर्च शासन करते. स्वयंसेवी संस्थेमार्फत ९० बालगृहे चालविण्यात येतात.

स्वयंसेवी संस्थांचे बाल सदन-

स्वयंसेवी संस्थेमार्फत बाल सदन चालविण्यात येतात. त्यामध्ये पूर्णतः अनाथ,

---

* प्रकर्षित प्रसिध्दी कक्ष, जव्हार, जि.ठाणे

निराधार व निराश्रीत बालकांना प्रवेश देऊन त्यांना पर्यायी कौटुंबिक वातावरण निर्माण करुन दिले जाते. १० मुलांसाठी एक पर्यायी मातेच्या ममतेखाली जिव्हाळा, प्रेम याबरोबरच संरक्षण,अन्न, वस्त्र, निवारा, शालेय शिक्षण,वैद्यकिय सेवा इत्यादीसाठी बालकांच्या परिरक्षणासाठी दरमहा दरडोई रु.४५०/- व इमारत भाडे, वैद्यकिय सेवा इ.साठी दरमहा रु.५०- अनुदान देण्यात येते. प्रवेश दिलेल्या लाभार्थ्यांची आयुक्तालयाकडून प्लेसमेंट ऑर्डर घेणे आवश्यक असते. याशिवाय सदर लाभार्थ्यांस अनुदान देण्यात येत नाही. राज्यात अशी ११२ बालसदने कार्यरत आहेत.

अनाथालयातील प्रवेश-

स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनाथालयात सोळा वर्षाखालील निराधार, निराश्रीत, अनाथ मुला-मुलींना प्रवेश दिला जातो. संस्थेमार्फत मुला-मुलींना संरक्षण, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत सुविधांबरोबरच शालेय शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन त्यांचे नोकरी व्यवसाय व विवाहाद्वारे पुनर्वसन करण्यात येते. संस्थेस मुलांच्या परिरक्षणासाठी दरमहा दरडोई रु.४५०/- व इमारत भाडे वैद्यकिय सुविधांसाठी रु.५०/- असे अनुदान देण्यात येते. राज्यात अशी अनाथालये कार्यरत आहेत.

निराश्रीत बालकाश्रम (डेस्टीट्यूट होम)-

पूर्णतः अनाथ, पालक नसल्याने झालेला अनाथ, पालकांना असाध्य रोग असलेल्या कुटुंबातील मुले, आर्थिकदृष्ट्या मुलांचा सांभाळ करण्यास असमर्थ असलेल्या कुटुंबातील मुले, यांना बालकाश्रमात प्रवेश दिला जातो. बालकाश्रमातील प्रवेशिताना संरक्षण, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत सुविधांबरोबरच शालेय शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, वैद्यकिय सुविधा उपलब्ध केल्या जाऊन प्रवेशितांचे नोकरी, व्यवसाय व विवाहाद्वारे पुनर्वसन केले जाते. राज्यात अशी ५४ बालकाश्रमे असून त्यांना प्रवेशिकाच्या परिरक्षणासाठी रु.४५०/- व इमारत भाडे, वैद्यकिय सेवा यासाठी रु.५०/- असे एकूण रु.५००/- दरमहा दरडोई अनुदान देण्यात येते.

बहुउद्देशीय सामूहिक केंद्र-

शहरातील गलिच्छ वस्ती व झोपडपट्टीतील मुले व महिलांसाठी रोग प्रतिबंधक कार्य्रकम महिलांची आरोग्य विषयक काळजी, गृहस्वच्छता, सकस आहार, बनविणे याबाबत मार्गदर्शन करणे, वाचनालय शिवणवर्ग,

छंदवर्ग, प्रौढ साक्षरता वर्ग चालविणे असे उपक्रम शासकीय बहुउद्देशीय सामूहिक केंद्रामार्फत चालविण्यात येतात. त्यामुळे मुलांना व महिलांना फावल्या वेळात फायदा घेता येऊन येथे मार्गदर्शन मिळते.

बालमार्गदर्शन केंद्र-

शहरातील गलिच्छ वस्ती व झोपडपट्टीतील मुले बाल गुन्हेगारीकडे वळू नयेत यासाठी त्यांना बालमार्गदर्शन केंद्रामध्ये फावल्या वेळात कसा उपयोग करावा, कोणते व्यवसाय करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. केंद्रमध्ये त्यांना वाचनालय, करमणुकीची साधने, खेळ साहित्य पुरविण्यात येते. राष्ट्रीय सण साजरे करुन मुलांमध्ये नागरिकांमध्ये राष्ट्रीय प्रेम व आदर निर्माण करण्यात येतो. राज्यात शासनामार्फत ४ तर संस्थेमार्फत ९ बाल मार्गदर्शन केंद्रे कार्यरत असून त्यांना वार्षिक रु.३०००/- अनुदान देण्यात येते.

बालमार्गदर्शन चिकित्सा केंद्र-

मुले मानसिकदृष्ट्या वेगवेगळ्या प्रकारे वागू लागली तर त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यापूर्वी बाल मार्गदर्शन केंद्रात मानसोपचार तज्ञांमार्फत कोणता उपाय करणे आवश्यक आहे याबाबत पालकांना मार्गदर्शन करण्यात येते. राज्यात स्वयंसेवी संस्थेमार्फत अशी १० केंद्रे कार्यरत आहेत. अशा संस्थेस वार्षिक रु.१००००/- अनुदान देण्यात येते.

बाल संगोपन योजना-

पालकांमधील कलह, पालकांचा मृत्यु, असाध्य रोग, अशा कारणामुळे अनाथ होणाऱ्या मुलांचा सांभाळ करण्यास असमर्थ असलेल्या कुटुंबातील ० ते १६ वयोगटातील मुलांना बाल संगोपन योजनेंतर्गत अल्प व दीर्घकाळ संगोपनासाठी दुसऱ्या पर्यायी कुटुंबाला देण्यात येतात. यासाठी संगोपनकर्त्या कुटुंबास दरमहा रु.२५०/- व योजना राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस दरमहा रु.५०/- प्रशासकीय खर्चासाठी अनुदान देण्यात येते.

दत्तक योजना -

हिंदू ॲडोप्टेशन ॲक्ट १९५६ व गार्डीयन अँड वॉर्ड ॲक्ट १८९० या दोन कायद्यान्वये दत्तक योजना राबविण्यात येतात. यामुळे कुमारी मातांनी टकून दिलेल्या निराधार अर्भकांना हक्कांचे घर मिळून संरक्षण मिळते. ज्या दांपत्यांना मूलबाळ नसेल अशांना हक्काचे बालक मिळते. असा दुहेरी फायदा या योजनेमुळे होतो. मान्यता प्राप्त संस्थेतील

अर्भके पालकांना दाखवून त्यांनी पसंत केलेल्या अर्भकांबाबतचे अर्ज घेण्यात येतात व ते कोर्टास सादर करुन कोर्टमार्फत पालकत्व देण्यात येते. शासन मुलास विनाअट बंधनमुक्त करते.

याखेरीज केंद्र शासनामार्फतही रस्त्यावरील मुलांचा विकास, शिशुगृह, राष्ट्रीय शिशुकक्ष यासारख्या बालविकास योजना राबविल्या जातात. या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी व अधिक मार्गदर्शनासाठी जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, ठाणे यांचेशी संपर्क साधण्यात यावा.

❊❊❊❊❊

आदिवासींच्या विविध नृत्य प्रकारांची तोंड ओळख

(संकलक) *श्री.डी.एस.मोडगी

प्रस्तावना-

महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमाती वर्षानुवर्षे वास्तव्य करीत असून त्यांच्या सध्या आस्तित्वात असलेल्या ४७ जमातीपैकी बहुतेक जमाती पारंपारिक नृत्यकला आजही त्यांच्या परिने जतन करीत आहेत. त्यांच्या परिसरानुसार आदिवासी जमाती चे पारंपारिक नृत्य सुध्दा ठरीवक आहेत. उदा.ठाण्यातील वारल्यांचे तारपा/तारपा पावरी नृत्य, नाशिक, रायगड मधील ठाकरांचा ढोलनाच, धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील भिल्लांचे लग्ननृत्य, यवतमाळमधील कोरकूंचे दंडारनृत्य,गडचिरोली मधील माडियांचे रेलॉनृत्य अशी वेगवेगळी नृत्यकला आदिवासी आपल्या भागात ठराविक वेळी सादर करतात. त्यापैकी काही नृत्यकलेची माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

घोरनृत्य -

मल्हार कोळी जमातीत घोरनृत्य केले जाते. सदरहू घोरनृत्यात टिपरी वाद्याचा उपयोग केला जातो. सदरहू घोरनृत्यात कंबरेला गुडघ्यापर्यत बांधलेला रूमाल, अंगात बंडी, गळ्यात रूमाल, स्त्रिया गुडघ्यापर्यंत कमरेला लुगडे, अंगात चोळी किंवा ब्लाऊज, गळयात रिबीन किंवा फुलांचा गजरा, हातात काचेच्या बांगडया, पुरूष व स्त्रिया एकमेकांच्या हातात हात घालून वाद्य वाजविणाऱ्यांमध्ये येऊन वाद्यांचा सूर, नृत्यकाराच्या पायाचा ताल आणि काठीचा ठेका याप्रमाणे सूर बदलेल त्याप्रमाणे हातापायाची हालचाल बदलून फेर धरून एका तालात एका सूरात एका ठेक्यात फेर धरून गोलाकार नाचतात.

पितृ आमावस्येपासून घोरनृत्याला

* सांस्कृतिक अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे १

सुरवात होते. मारूतीचा उत्सव असतो त्यावेळीसुध्दा नृत्य केले जाते. सदरह् घोरनृत्य दिवाळीच्या भाऊबीजेपर्यंत करण्यात येते.

घोरनृत्य सादर करताना खालीलप्रमाणे नृत्यगीत सादर केले जाते.

चौकोनी अंगणी देवा निर्मल दिसते
मोठया लोकांची सभा भरली तसा
देवासारखी दिसते बारी
पोरांची सभा भरते म्हणजे
सोन्यासारखी दिसते

नृत्यपथक : घोरनृत्यपथक, धमरपूर, पो, सायवन, ता, डहाणू, जि, ठाणे

ढोल नाच -

कोकणा आदिवासींमध्ये ढोलनाच करतात. ढोलनृत्यात कोकणा आदिवासी ढोल व घुंगरू वाद्यांचा वापर करतात. पोळा, दिवाळी, दसरा व गणेश उत्सवात ढोलनाच करतात. कोकणपर्यंत या नृत्यास विशेष महत्व आहे. नृत्याचा काळ म्हणजे पावसाळयाचे सुरवातीपासून दिवाळीपर्यंतचा आहे. पावसाळयास सुरवात झाली की ढोल गाण्यावरील नृत्यास सुरवात होते. यात फक्त पुरूषच नाचतात. ते इतके जोरजोराने नाचतात की अंगातून घामाच्या धारा चाललेल्या असतात. ही वेळ शेतीच्या कामाची व घरातील धान्य संपण्याची असते. पावसाळा सुरू झाल्यावर शेतीच्या कामाला सुरवात झालेली असते. त्यामुळे आदिवासी आनंदाने नाचतात. आदिवासी भागामध्ये करमणूकीचे कोणतेही साधन नसल्यामुळे व आनंद व्यक्त करण्यासाठी हे नृत्य केले जाते.

होळीनृत्यातील जंगलीनृत्य -

भिल्ल आदिवासींमध्ये होळी नृत्यातील जंगली नृत्य हा एक नृत्याचा प्रकार आहे. सदरह् नृत्यामध्ये ढोल व ताशा इत्यादी वाद्यांचा उपयोग केला जातो. नंदुरबार व धुळे जिल्हयात बहुतांशी भिल्ल आदिवासी राहतात. जंगली नृत्यामध्ये भिल्ल आदिवासी नर्तक कमरेस हिरवे कापड व ओल्या झाडांची पाने बांधून व हातात धनुष्यबाण घेऊन नृत्य करतात. होळीच्या सणाला व दिवाळीच्या सणाला भिल्ल आदिवासी करमणूक व सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून नृत्य करतात.

घोसाडी नृत्य -

अमरावती, यवतमाळ व चंद्रपूर जिल्यातील गोंड व कोलाम आदिवासी घोसाडी नृत्य करतात. नृत्यामध्ये ढोल, डफ वाद्याचा उपयोग करतात. दिवाळीच्या सणाला घोसाडी नृत्य सादर केले जाते. कोलामांच्या पारंपारिक नृत्यापैकी एक दंडाराच्या एकवीस नृत्य फेरातील

हा महत्वाचा प्रकार आहे. या नृत्यासाठी घोसाडी नावाचा टोप व शरीर रंगविणे हे महत्वाचे आहे. महाराष्ट्रच्या आदिम नृत्यापैकी एक कलाविष्कार.

नृत्यपथक : जय पेरमापेन घोसाडी नृत्यपथक, मु. पाटण, पो. पाटण, ता. राजूरा, जि. चंद्रपूर

गोंडी दंडार नृत्याबाबत दंतकथा -

फार वर्षापूर्वी सियनूर घुयनुर पटेला नावाच्या गावी "गोदमले" नावाचा द्रविड वंशीय राजा राहत होता. त्याला रमाटोली नावाची पत्नी होती. त्यांना यादीराहुल, जुगादीराहुल, शिरमाराहुल, अराहुल व दोदल्याराहुल अशी पांच मुले होती. ते पाचही बंधु अविवाहित होते. त्यामुळे एकदा ते पाचही भाऊ मुलीच्या शोधार्थ भटकंतीस निघाले. फिरता फिरता ते गुदमासुर पटेला या गावी पोहोचंले. तिथे तुसमासूर व त्याची पत्नी पद्मालपुरी काको यांचेकडे घरकाम करण्यासाठी हिराज्योती माळको नावाची त्यांची नात रहात होती. (तोंडीसूर राक्षसाची मुलगी) त्यांना तिथे मुलगी असल्याचे कळताच ते पाचही भाऊ तिला वश करण्यासाठी दंडार घेऊन वेशांतर करून गुदमासूर गावी पोहोंचले. त्यांच्या घरी गेले. तिथे गेल्यावर वेशांतरभूषणात दोंदल्या व शिरमा यांनी तुरबुडी व परा हे वाद्य वाजविण्यास प्रारंभ केला. यादी व जुगादी हे दोघे वाद्याच्या तालावर नाचू लागले. तेंव्हा तिची आजी नातीला घरात कोंडून ठेऊन नृत्य पाहण्यास बाहेर आली. तेवढयात नातीने कुडाच्या भिंतीला भोक पाडून ती लपून नृत्य पाहू लागली. ते नृत्य तिला खूप आवडले. ती भाळली, वश झाली. म्हणून ती बाहेर आली व दोंदल्या राहुल याचा हात धरून निघून गेली व त्याचेशी तिचा विवाह झाला.

अशा प्रकारे या नृत्यातून पुढे सोयरिक करण्याची पध्दत रूढ झाली. तेंव्हापासून दंडार हे नृत्य राजगोंड जमातीत निश्चित वेळेस (दिवाळी) नाचण्याची प्रथा सुरू झाली. ती आजतागायत सुरू आहे.

मत्स्यनृत्य -

कोकणा आदिवासींमध्ये मत्स्यनृत्य केले जाते. मत्स्यनृत्यामध्ये ढोलकी, पावरी, नाल, पावा, झांझरी, डफ इत्यादी वाद्ये वाजवितात. अक्षयतृतीयेच्या दिवशी मत्स्य पकडणेसाठी सामुहिक रितीने जातात. त्यावेळेस सामुहिक गाणे म्हटले जाते. मासेमारी करताना शिकार सापडल्याने आनंद व्यक्त करताना खालीलप्रमाणे नृत्यगीत गातात.

"आम्ही आदिवासी लोक, आम्ही जंगलचे रहिवासी"

होळीनृत्य -

सातपुडयातील आदिवासी लोकांचा होळी हा सण पारंपारिक आहे. भिल्ल व पावरा या जमातीत या सणाला खूप महत्व आहे. या सणात बायका-मुलांपासून वृध्दांपर्यंत देहभान हरपून प्रत्येकजण या सणाचा आनंद लुटतात. होळी ही खूप मोठी देवता आहे. कुटंबात रोगराई होऊ नये, पिक समाधानकारक यावे, गुरेढोरे निरोगी रहावीत, मूलबाळ व्हावे यासाठी होळीमातेला नवस करतात.

धुळे, नंदूरबार जिल्यातील भिल्ल व पावरा आदिवासी होळीनृत्य करतात. होळी नृत्यामध्ये ढोल, ढोलकी, पावरी, बासरी, रोढया इत्यादी वाद्याचा वापर करतात.

होळीनृत्याबाबतची दंतकथा अशी आहे की, होळीमाता राजा पोरोबराया (वडील) व आठाडुंगर (आई) यांची मुलगी आहे. होळीमातेचे बालपणीचे नांव बांली असे होते. टापरदेव, राजा गिमल्या हे होळीचे नातेवाईक आहेत. होळीचा जन्म चंद्रग्रहणाच्या दिवशी आला म्हणून तिला अपशकुनी मानले गेले व होळीला कोणाच्या तरी स्वाधिन करावी असे ठरले. तिचा जन्म चांगला नाही म्हणून कोणी भिकारी आला तर त्याला देण्याचे ठरले. परंतू एके दिवशी राजा पोरोबरायाच्या घरी काल्या व पोहल्या हे चोर चोरी करायला आले. त्यांनी राजा पोरोबरायाच्या घरून सायवान बकरी व होळी यांची चोरी करून पूर्व दिशेला निघून गेले. राजा फांटा व गाडा ठाकूर यांना स्वप्न पडले की, पूर्वेकडे सायवान बकरी व होळी यांना चोरांनी चोरून नेले आहे.

होळी वयात आली व तिला तिच्या जोडीदाराचा प्रश्न पडला होता. ती रूपवान असून देखिल तिला कोणीही लग्नासंबंधी विचारत नव्हते. म्हणून तिने देवाजवळ प्रार्थना केली. देवाने तिला वरदान दिले की, तुझ्या नशिबात तुझे लग्न एका अस्पृश्य माणसाबरोबर होणार आहे. तेंव्हा होळी खूप नाराज झाली व तिने सगळे जग पालथे केले व ठरविले की, माझे नशिब मी माझ्या हाताने बनवेन. परंतु काही काळानंतर फिरता फिरता एका राजवाडयात गेली. त्या ठिकाणी पाणी प्याली. राजवाडा हा अस्पृश्य राजाचा होता आणि ती शेवटी त्याच घरची सून झाली. कारण तिच्या नशीबातच असे

होते. होळीला एक मुलगा झाला त्याचे नांव मेलादा (मेळावा) म्हणून होळी सणाच्या दुसऱ्या दिवशी मेळावा भरतो.

काही दिवसांनी होळी घरदार सोडून दुसऱ्या राज्यात निघून जाते व छोटयाश्या झोपडीत राहते व आपल्याच मुलाला झोपडी जाळायला सांगते ती झोपडीतच असते आणि जळून खाक होते.

ढोल टापरीनृत्य -

ठाणे जिल्हयातील कोकणा व वारली आदिवासींमध्ये ढोल टापरी नृत्य करतात. नृत्यामध्ये ढोल, तारपा, डफ, झांजर इत्यादी वाद्यांचा वापर करतात. लग्न समारंभ व होळीच्या सणानिमित्त ५ दिवस नृत्य सादर केले जाते. वाद्यांच्या तालसुरांच्या साथीत नृत्याचा सुंदर अविष्कार लग्नाचे वेळी मंडपाबाहेर साकार होतो. मुख्यतः करमणूक हाच नृत्याचा उद्देश असला तरी होळीच्या सणाच्या वेळी ५ दिवस धार्मिक श्रध्देने नृत्य केले जाते. नारनदेव पूजेच्या वेळी पेरणीपूर्वीही या नृत्याचा समावेश पूजा नृत्यात केला जातो.

नृत्यपथक : ढोलटापरी नृत्य कलापथक, मु.पो. गांगोडबारी, ता. पेठ, जि. नाशिक

तारपानृत्य -

ठाणे जिल्हयातील वारली, मल्हारकोळी आदिवासी तारपानृत्य करतात. तारपा नृत्यात तारपा वाद्याचा वापर करतात. कंबरेला गुडघ्यापर्यंत बांधलेला रूमाल, अंगात बंडी, गळयात रूमाल, स्त्रिया गुडघ्यापर्यंत कमरेला लुगडे, अंगात चोळी किंवा ब्लाऊज, गळयात रिबीन किंवा फुलांचा गजरा, हातात काचेच्या बांगडया, पुरूष व स्त्रिया एकमेकांच्या हातात हात घरून वाद्य वाजविणारा मध्ये येऊन वाद्यांच्या सूर, नृत्यकारांच्या पायाचा ताल आणि काठीचा ठेका याप्रमाणे सूर बदललेल्याप्रमाणे हातापायाची हालचाल बदलून फेर धरून एका तालात एका सूरात एका ठेक्यात गोलाकार नाचतात.

तारपा नृत्य पारंपारिक असून ठाणे जिल्हयात मल्हारकोळी व वारली आदिवासी नृत्य करतात. हे नृत्य गौरी गणपतीच्या सणापासून सुरू करतात व दिवाळीच्या सणाला नवीन कपडे, गोडधोड पक्वान्न करून पारंपारिकरित्या डोंगर देवाला व अन्नपूर्णामाता यांची तारपा नृत्य वाजून सणाला पूजा केली जाते. नंतर पाडयापाडयातील गावांतील मुले-

मुली, पुरूष व स्त्रिया जमा होऊन घरोघरी जाऊन मौजेने तारप्याच्या तालावर नृत्य करीत असतात.

तारपा नृत्याबाबत दंतकथा विधीलिखित नाही. सर्व देवदेवतांची पूजा करण्यासाठी आणि स्फूर्ती येण्यासाठी देवदेवतांच्या समाधानासाठी वाद्य वाजवितात. इंद्रसभेतील नाच करणाऱ्या अप्सरासुध्दा नाच करण्यासाठी खाली येत असतात अशी दंतकथा आहे.

नृत्यपथक : तारपानृत्यपथक, मु. वाघाडी, पो. कासा, ता. डहाणू, जि. ठाणे

गौरीनृत्य -

मल्हार कोळी आदिवासी गौरी नृत्य करतात. गौरीनृत्यामध्ये ढोलकी, ताशा व घुंगरू इत्यादी वाद्यांचा उपयोग करतात. नागपंचमीच्या सणापासून गौरीनृत्याला सुरवात होते. लोकांची नुकतीच रोपणी झालेली असते. हया आनंदात नृत्य करतात. श्रावण महिन्यापासून भाद्रपद महिन्यापर्यंत गौरीनृत्य करतात. हया नृत्यात ढोलकी वाजविणारा असतो व त्याच्याभोवती फेर धरून नृत्य केले जाते.

नृत्यपथक : गौरीनृत्यपथक, मु. कासपाडा (उधवा), पो. कळमदेवी, ता, तलासरी, जि. ठाणे

गोंडी लग्ननृत्य -

गोंड जमातीमध्ये गोंडी लग्न नृत्य केले जाते. नृत्यामध्ये घुंगरू, ढोलकी, डफरी वाद्यांचा उपयोग करतात. दिवाळी, होळी सणाच्या वेळी गोंड आदिवासी नृत्य करतात. रेला रेला रे हे नृत्यगीत म्हटले जाते.

पथक : १. आदिवासी नृत्यपथक, लगाम, पो, लगाम, ता, मुलचेरा, जि. गडचिरोली

२. आदिवासी नृत्यमंडळ, चुटूगुंठा, पो. लगाम, ता. मूलचेरा, जि. गडचिरोली

ढोलपाई नृत्य -

कोकणा आदिवासींमध्ये ढोलपाई नृत्य करतात. ढोलपाई नृत्यात पावरी, ढोल व झांजरी वाद्यांचा उपयोग करतात. होळी, दिवाळी, रंगपंचमी इत्यादी सणांच्या वेळी अनेक स्त्रिया व पुरूष एकत्र येऊन नृत्य करतात. ढोल पावरीच्या वाद्यावर मागेपुढे पारंपारिक पध्दतीने नाच केला जातो. "पावा बोले गडया" हे नृत्यगीत सादर केले जाते. नृत्याबाबतची दंतकथा अशी सांगितली जाते की, आदिवासी जमातीवर जेंव्हा संकट येते तेंव्हा ते देवाची आराधना करतात व देवांचा धावा करण्यासाठी प्रार्थना केली जाते.

नृत्यपथक : मु. तानाणी, ता. बागलाण, जि. नाशिक

❁❁❁❁❁❁



पुस्तक परीक्षण

पुस्तकाचे नांव	:	वारली चित्र संस्कृती
लेखक	:	डॉ.गोविंद गारे
प्रकाशक	:	श्री विद्याप्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे ३०
एकूण पाने	:	१६४
किंमत	:	रु.१५०/-
पुस्तक परिक्षक		विजया कुलकर्णी

महाराष्ट्रात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार देशातील आदिवासी लोकसंख्या ७७.८ टक्के आहे. महाराष्ट्रात त्याचे प्रमाण ९.२. टक्के इतके आहे. 'वारली' ही एक महाराष्ट्रातील अनुसूचित जमात आहे. या जमातीची प्रामुख्याने वस्ती ही ठाणे, मुंबई उपनगरे व गुजराथ राज्यातील सुरत व डांग केंद्रशासित प्रदेश नगर हवेली जिल्ह्याच्या काही डोंगराळ भागात आढळून येते.

डॉ.विल्सन यांच्या मते वारली म्हणजे 'वरेल' किंवा 'वरच्या भूभागात राहणारे' ठाणे जिल्ह्यात वारल्यांची वस्ती जास्त असून ते वरच्या डोंगराळ भूभागामध्ये आढळून येतात.

या पुस्तकात लेखकाने सुरवातीच्या पहिल्या व दुसऱ्या प्रकरणामध्ये वारली प्रदेश, त्यांची वस्ती, वस्तीला देण्यात आलेले नांव 'पाडा' इ.माहिती दिली आहे. यात वस्तीच्या अनुषंगाने येणारी त्यांची घरे, कुटुंबे, कुटुंबातील संख्या, त्यांचा आहार, विहार, पोषाख, उद्योगधंदे इ.ची माहिती विस्ताराने मांडली आहे. तसेच त्यांचे सण, लग्नविधी इ.माहिती असून त्या अनुषंगाने येणारी त्यांची सांस्कृतिक माहिती उदा.त्यांचे देव, देवी, सण उत्सव, नृत्य, वाद्ये इ.माहिती या पुस्तकात लेखकाने दिलेली आहे.

तिसऱ्या प्रकरणात लेखकाने वारली चित्रकला, स्वरुप, माध्यम आणि विषय हाताळलेला आहे. या प्रकरणात वारली ही जमात मूलतः निसर्गात राहत असल्याने त्यांची निसर्गाशी जवळीक आहे. या जवळीकीतून त्यांची चित्रकला प्रगट होताना दिसून येते. ४७ आदिवासी अनुसूचित जमातीपैकी हस्तकला,

चित्रकलामध्ये पारंगत असणारी व पारंपारिक पध्दतीने चित्रकलेची जोपासना केलेली 'वारली'ही महाराष्ट्रातील एक प्रमुख जमात आहे. या जमातीची वारली चित्रकला ही एक वैशिष्ठ्यपूर्ण व निसर्गदत्त पारंपारिक कला असल्याचे दिसून येते. या प्रकरणात वारली कशाप्रकारे चित्रे तयार करतात, त्यासाठी कोणकोणती साधने वापरतात, लग्न, नृत्य, सण समारंभ इ.वेळी काढावयाची त्यांची प्रासंगिक चित्रे, त्या त्या चित्रांची मध्यवर्ती कल्पना इ.त्यांच्या स्वतःच्या असतात. यात कुठेही दुसऱ्याचीं कल्पना त्यांनी घेतलेलीनसते. तर हे सर्व त्यांना निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे उस्फूर्त पध्दतीने चित्राकृती निर्मिती केली जाते. यात निसर्ग हाच त्यांचा गुरु असतो. निसर्गाकडून ते वर्तुळ, रेघा, चौकोन झाडांची पाने, फुले, चंद्र, सूर्य, वेलींचा वेटोळा आकार घेऊन चित्रे तयार करताना दिसून येतात.

वारली विवाह व विवाह संस्कृतीच्या चित्रात नवरा-नवरीची बाशिंगे, घोड्यावरुन जाणारी नवरा-नवरी, नारळांचा कलश, झाडे, झोपडी, प्राणी इ.चित्रे दिसतात. तारपा नृत्यांचे रिंगण तारपावादक व वारल्यांचे एकमेकांच्या हातात हात घालून तयार केलेले रिंगण लय, ताल, सूराच्या सहाय्याने सामूहिक नृत्याचे अविष्करण लेखकाने दाखविले आहेत. तिसऱ्या एका चित्रात भात संस्कृतीचे स्थान दाखविले आहे. वारल्यांचे प्रमुख अन्न भात असून त्याची पेरणी, मळणी, काढणी इ.चित्रण केलेले दिसून येते. याशिवाय निसर्गचित्रे, पशुपक्षी, झाडे, प्राणी, नदी, नाले, डोंगर इ.दैनदिन जीवनात सतत दृष्टीस पडणारे व त्यांच्या जीवनाशी एकरुप झालेले घटक यांची चित्रे काढलेली दिसून येतात.

या प्रकरणात लेखकाने वारली चित्रकार किती विविध विषय सहजपणे चित्रित करतो त्यांचे अनेक नमुने दर्शविलेले आहेत.

चौथ्या प्रकरणात लेखकाने विविध वारली चित्रकारांचा परिचय करुन दिलेला आहे. मूळ प्रेरणास्त्रोत त्यांना निसर्गाकडून होत असतो. परंतू या प्रेरणास्त्रोतामागे वारली पांरपारिक चित्रकलेचा प्रणेता जिवा सोमा म्हसे आहे. हे वारल्यांचे प्रख्यात चित्रकार आहेत. त्यांची दिल्ली येथील त्रिवेणी केंद्रात, मुंबईच्या जहांगिर आर्ट गॅलरीत तर परदेशात फ्रान्समध्ये द्विवार्षिक प्रदर्शनात चित्रांचे प्रदर्शन भरण्यात आलेली होती. त्यांना राष्ट्रपतीकडून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेला आहे. या पारंपारिक चित्रकलेत त्यांनी मोठा शिष्यवर्ग निर्माण केलेला आहे. महाराष्ट्र शासनानेही 'आदिवासी सेवक' हा पुरस्कार देऊन गौरविलेले आहे, हे या प्रकरणात लेखकाने विस्तृतपणे दिलेले आहे.

हरेश्वर वनगा, दामा मंगळ्या देसक, बाळू लाडक्या दुमाडा, नथू देऊ सुतार, जानकी बापू वायेडा, रत्ना बुध्या धुलसाडा, चिंतू देऊ कडू इ.चित्रकांराची चित्रेही या पुस्तकात दर्शविलेली आहेत.

शेवटच्या पाचव्या प्रकरणात वारली चित्रकलेची वैशिष्ठ्ये व समीक्षात्मक आढावा घेण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे 'वारली चित्रसंस्कृती' हा एक उत्तम आदिवासी पारंपारिक चित्रकलेचा मौलिक संदर्भ ग्रंथ ठरला आहे. या पुस्तकामुळे आदिवासींमध्ये असलेली अभ्यासूवृत्ती, चिकाटी व निरीक्षण शक्ती अशा अनेक अंगाची त्यांना दैवीशक्ती प्राप्त झालेली दिसून येते. या पुस्तकाचा सर्वात चांगला उपयोग चित्रकलेच्या क्षेत्रात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी, संशोधकांना तसेच या कलेत काम करणाऱ्यांनाही होऊ

शकेल.

मुख्यत्वे मराठी भाषेतून वारली चित्रकलेवर असलेला हा अभ्यासपूर्ण व विविध चित्रांनी समाविष्ट असलेला हा एक उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ आहे. आज हा ग्रंथ चित्रकला, कला क्षेत्रातील व अभ्यासकांसाठी ठेवण्यात आलेला आहे.

डॉ.गोविंद गारे, यांची अलिकडेच अन्यही काही महत्वपूर्णपुस्तके मराठीतून प्रकाशित झालेली आहेत व काही नवीन पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. तीही अभ्यासपूर्ण अशी आहेत. या पुस्तकांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

प्रकाशित झालेली पुस्तके	प्रकाशनाच्या मार्गावर असलेली पुस्तके
१. *बदलत्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी श्रीविद्या प्रकाशन, पुणे किंमत रु.१५०/-*	१ पैनगंगेच्या काठचे आदिवासी
२. *महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे किंमत रु.१५०/-*	२ सह्याद्रीतील ठाकर ठाकूर आदिवासी
३. *आदिवासी विकासातील दीपस्तंभ श्रीविद्या प्रकाशन, पुणे किंमत रु.२२५/-*	३ हासऱ्या रानफुलांच्या प्रदेशात (प्रवासवर्णन)
४. *आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ सुगावा प्रकाशन, पुणे किंमत रु. ९०/-*	

वृत्तविशेष-

आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री- विशेषवृत्तांत

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभाग आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्सच्या सी.एम.शहा हॉलमध्ये दिनांक ९ ते १२ फेब्रुवारी,२००१ च्या कालावधीत आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी व त्यांच्या कलेला उत्तेजन देण्यासाठी राज्यस्तरीय आदिवासी हस्तकला प्रदर्शन भरविण्यात आले होते.

सदरह् प्रदर्शनाचे उद्घाटन मा.ना.श्री.प्रकाश आवाडे. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करण्यात आले. उद्घाटनाच्या कार्यक्रमाप्रित्यर्थ इन्स्टिटयूशनच्या फिरोदिया हॉलमध्ये फिल्म अँड टेलिव्हीजन इन्स्टिटयूटचे संचालक श्री.मोहन आगाशे उपस्थित होते. त्याचप्रमाणे समाज कल्याण विभागाचे निवृत्त सहसंचालक श्री.अनंतराव बोधनकर, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे माजी संचालक डॉ.गोविंद गारे आणि भूजल सर्वेक्षण विभागाचे संचालक श्री.जाधव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

उपस्थित सर्व प्रमुख पाहुणे व प्रमुख अतिथी यांनी सी.एम.शहा हॉलमध्ये भरविण्यात आलेल्या आदिवासी हस्तकला प्रदर्शनास भेट दिली व आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या वस्तुंची प्रशंसा केली. सदरह् प्रदर्शनात महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून एकूण ६५ कलाकार सहभागी झाले होते. महाराष्ट्र राज्यातील एकूण २४ प्रकल्पापैकी १३ प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील हस्तकला कारागिरांनी भाग घेतला होता. त्याचे कलाप्रकारानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे-

आदिवासी विकास प्रकल्पनिहाय व कलाकार/हस्तकला प्रकारानुसार वर्गीकरण

अ.क्र.	हस्तकला प्रकार	संख्या
१.	वनौषधी	११
२.	वारली पेंटींग्ज	११
३.	बांबूच्या हस्तकला वस्तु	१२
४.	नागली पदार्थ	७
५.	लाकडी हस्तकला वस्तु	५
६.	वेताच्या वस्तु	३
७.	पितळी कोरीव काम	१
८.	लाकडी वस्तु	३
९.	बांबूक्राफ्ट	१
१०.	लाकडी कोरीव काम व शिल्प	५
११.	ड्रीपवूड	४
१२.	मुखवटे	२
एकूण		६५

प्रकल्पाधिकारी कार्यक्षेत्रानुसार वर्गीकरण

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	संख्या		अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	संख्या
१.	डहाणू	११		८.	धारणी	२
२.	जव्हार	९		९.	पांढरकवडा	२
३.	शहापूर	४		१०.	नागपूर	१
४.	पेण	४		११.	देवरी	१०
५.	घोडेगांव	६		१२.	गडचिरोली	४
६.	नासिक	३		१३.	चंद्रपूर	२
७.	कळवण	७			एकूण	६५

हस्तकला प्रकारनिहाय खालीलप्रमाणे वस्तु विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आल्या होत्या. त्या प्रामुख्याने खालील प्रकारच्या होत्या.

अ.क्र.	कलाप्रकार	तपशील
१.	वनौषधी	मध, आवळा सुपारी, वाताचे तेल, शतावरी कल्प, अडुळसा, शिकेकाई पावडर, औषधी चूर्ण, मलम व तेल, मधुमेह वनौषध
२.	वारली पेंटीग्ज	कॅनव्हासवरील पेंटीग्ज, ग्रिटींग्ज, पेपरशीट, वॉलपीस
३.	बांबूच्या वस्तु	बैलगाडी, शिटी, लॅम्पशेड, लेटरबॉक्स, सूर्य, बास्केट, हाऊसबूट, पट्टा, ब्रशस्टँड, ग्रिटींग्ज, परडी, फ्लावर परडी, होडी, फुलदाणी, क्रेाच बास्केट, कुडी
४.	कलाकसूरीच्या वस्तु	धनुष्यबाण, हरण, लॅम्पशेड, बैलगाडी, फुलदाणी
५.	नागली पदार्थ	नागली पापड, तांदूळ पापड, नागली सत्व, आवळा सुपारी, खुरासणी चटणी, गरम मसाला, कुळीथपीठ, भगर,नागली, खुरासणी
६.	लाकडी वस्तु	लाकडी ट्रे, गणपती फ्रेम, लॅम्पशेड
७.	वेताच्या वस्तु	अंबाडी स्टूल, वेताचे स्टूल, झुला, अंबाडी, फोल्डींग खुर्ची, लाकडी मंदिर, सोफासेट, डायनिंग सेट
८.	पितळी कोरीव काम	आदिवासी मूर्ती, हरिण, ओपनर, घाटी देवी, देवतांच्या मूर्ती, शिकारी, तोंडी, सतकारा, आदिवासी नृत्य
९.	बांबू क्राफ्ट	जहाज, लॅम्प, घर फ्लावर पॉट, वारली चित्रे, कचरा पेटी, रावण टोपली, फुलदाणी, नारळी, टेबल लॅम्प, मंदिर, गाडी, टोपी
१०.	लाकडी कोरीव काम व शिल्प	गणपती, गौतम बुध्द,शिवलिंग, म्युझिशियन, घड्याळ, टेबल लॅम्प, मोरपीस, घोडा गुलदस्ता
११.	डीपवूड	साप, ससा, बदक, मोर, गणपती, फ्रेमशोपीस, विंचू, मगर, पेपरवेट
१२.	लगद्याचे मुखवटे	गणपती, देवी, माकड, कासव, ससा, हरण, राक्षस, विष्णूदेव, सिंह इ.

वरील विविध हस्तकलेच्या वस्तु दि.९.२.२००१ ते १२.२.२००१ या कालावधीत प्रदर्शनासाठी व विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. त्याची अंदाजित किंमत रु.१३,८०,२९५/- इतकी होती. त्यापैकी प्रदर्शनाच्या कालावधीत सुमारे रु.७,९६,९१८/- इतकी रोख विक्री झाली आहे.

प्रदर्शनात विक्रीसाठी आणलेल्या वस्तुंपैकी मध, करवंदाचे लोणचे, आवळाकॅन्डी, आंबा लोणचे, आवळामुरांबा इ.वस्तु सर्व विकल्या गेल्या आहेत. सदर प्रदर्शनात विक्री प्रामुख्याने सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे झालेली आहे.

प्रदर्शनात विक्रीस ठेवलेल्या वस्तुंचे गटवार वरील तक्त्याचे अवलोकन केले असता डीपवूड या वर्गीकरणाची विक्री जास्त म्हणजे ९२.५६ टक्के इतकी झालेली आहे. तर लाकडी वस्तु व बांबूच्या हस्तकला वस्तु, लाकडी कोरीव काम व शिल्प यांची विक्री अनुक्रमे ८४.२६,८१.२४ व ८९.८६ इतकी झालेली आहे. तथापि, सदर प्रदर्शनात वनौषधी, वेताच्या वस्तु व पितळी कोरीव काम याची विक्री अपेक्षापेक्षा कमी झालेली आहे.

(तक्ता पुढील पानावर देण्यात आला आहे....)

हस्तकला प्रदर्शनात विक्रीस ठेवलेल्या वस्तु व त्याचा कलाप्रकारनिहाय विक्री तपशील

अ.क्र.	हस्तकला वस्तुचे नांव	विक्रीस आणलेल्या वस्तुंचे मूल्य	विक्री कालावधी				एकूण विक्री	शेकडा प्रमाण
			९.२.२००१	१०.२.२००१	११.२.२००१	१२.२.२००१		
१.	वनौषधी	१,८१,०२१	५,६१५	७,५१०	६,४८५	७,८६०	२७,४७०	१५.१७
२.	वारली पेंटीग्ज	१,०६,८५५	१५,४०६	९,५१५	९,२३५	९,११५	४३,२७१	४०.५०
३.	बांबूच्या हस्तकला वस्तु	९५,०००	२६,२६१	२१,५१९	१२,८६४	१९,४००	८०,०४४	८४.२६
४.	नागली पदार्थ	६४,३५७	५,५१८	८,७००	४,४८४	३,०११	२१,७१३	३३.७४
५.	लाकडी हस्तकला वस्तु	१,५७,१००	८४०	१,२४,१०५	२,६३४	४५	१,२७,६२४	८१.२४
६.	वेताच्या वस्तु	७९,५९०	८२५	१,५४०	१,०३०	१,८५०	५,२४५	६.५९
७.	पितळी कोरीव काम	३४,१२५	६,२८५	४,००५	१९०	१,३००	११,७८०	३४.५२
८.	लाकडी वस्तु	२,२७,८२५	३६,५७५	१,३७५	२७,७६८	५८,८७५	१,२४,५९३	५४.६९
९.	बांबू क्राफ्ट	४७,५६२	१,१२५	२,४३०	२,४३१	२,७५०	८,७३६	१८.३६
१०.	लाकडी कोरीव काम, शिल्प	३,१२,१३५	३१,१६५	८०,६४०	१,२८,१०२	४०,५८५	२,८०,४९२	८९.८६
११.	डीपवूड	६७,२२५	१३,४३०	१०,२६०	३३,५४५	४,९९०	६२,२२५	९२.५६
१२.	लगद्याचे मुखवटे	७,५००	२,५२५	४००	६००	२००	३,७२५	४९.६६
	एकूण व्रिकी रुपये	१३,८०,२९५	१,४५,५७०	२,७१,९९९	२,२९,३६८	१,४९,९८१	७,९६,९१८	५७.७४

वृत्तविशेष-

संस्थेमार्फत दुर्गम भागातील आदिवासी युवकांसाठी हातपंप दुरुस्ती व देखभाल विशेष प्रशिक्षण सत्र दि.९.२.२००१ ते ११.२.२००१ या कालावधीत पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन मा.राज्यमंत्री महोदय श्री.प्रकाशजी आवाडे यांचे हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षण सत्रास एकूण ३९ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थींना भूजल सर्वेक्षण विभागातील तज्ञांमार्फत हातपंप दुरुस्ती व देखभालीबाबतचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाच्या निमित्ताने प्रशिक्षणार्थींना मा.मंत्री महोदयांच्या हस्ते हातपंप दुरुस्तीस लागणारी आवश्यक साधनसामुग्री देण्यात आली. प्रशिक्षणाचा निरोप समारोप मा.आयुक्त, श्री.आर.डी.खरोसेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले व प्रशिक्षणार्थींनी सदरचे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त असल्याचे मनोगत व्यक्त केले.

संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील डोंगरदऱ्यामध्ये राहून पारंपारिक पध्दतीने औषधोपचार करणाऱ्या वैदुंचे प्रशिक्षण दि.३०.३.२००१ ते १.४.२००१ या कालावधीमध्ये जनसेवा दत्ताश्रम यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन मा.आयुक्त, श्री.अनिल डिग्गीकर यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी मा.आयुक्त, श्री.आर.डी.खरोसेकर, यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थींना आयुर्वेदातील तज्ञ डॉक्टर व तज्ञ वैदूंनी विविध रोगांवरील औषधोपचाराबाबत मार्गदर्शन केले. तसेच आलेल्या रुग्णांवर प्रत्यक्ष औषधोपचाराची पध्दत ही प्रात्यक्षिकासह दाखविण्यात आली. या प्रशिक्षण सत्राचा निरोप समारोप अधिव्याख्याता यांचे उपस्थितीत संपन्न झाला. प्रशिक्षणार्थी वैदूंनी हे प्रशिक्षण सत्र त्यांच्या व्यवसायाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त झाले असे मनोगत व्यक्त केले.

❁❁❁❁❁

"Training of Traditional Medical Practitioners in the modern medical system so that they can provide better quality health services in the tribal area and take care of consequences also" - A study Report

सर्व राज्यांच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थांचे संचालक आणि आदिवासी विकास विभागाचे सचिव यांची दि. १६ मे २००० रोजी दिल्ली येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. तदनुसार केंद्र शासनाच्या ट्रायबल अफेअर्स विभागाने उपरोक्त विषयाबाबतचा अभ्यास अहवाल करण्याबाबत या संस्थेस सुचविलेले आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील या संस्थेकडे उपलब्ध असलेल्या ११० पांरपांरिक वैदुंच्या यादीतील ७० वैदुच्या क्षेत्रिय मुलाखती घेउन माहिती मागविलेली आहे. तसेच अशा उपचाराने बरे झालेल्या ३५० रूग्णांच्या मुलाखती घेण्यात आल्या. याबरोबरच संबंधित वैदुच्या गावातील प्रत्येकी एक अशा ७० पुढारी यांचेकडूनही याबाबतची माहिती मिळविली आहे. सदरील माहिती विहित प्रपत्रामध्ये मिळविली आहे.

उपलब्ध माहितीवर आधारित अहवालाचे कामकाज प्रगतीपथावर आहे. कामकाज पूर्ण होताच अहवाल प्रकाशित करण्यात येईल.

TRIBAL RESEARCH & TRAINING INSTITUTE'S PUBLICATIONS FOR SALES

संस्थेची विक्रीची प्रकाशने

1.	An Overview of Tribal Research studies	Rs.100=00
2.	A Review of Tribal Research Studies	Rs.35=00
3.	Socio cultural Dynamics of Tribal Development	Rs.19=00
4.	Strategies for Promotion & Propogation of Tribal Art and Handicrafts	Rs.50=00
5.	**आदिवासी लोकगीते**	Rs.7=00
6.	Tribal Research Bulletin Annual subscription	Rs.100=00

♦ ♦ ♦

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-४११ ००१.

गडचिरोली जिल्ह्यातील माडिया आदिवासी
कलाकारांचे तेंडोळी वादन करताना.

जव्हार, जि.ठाणे मधील वारली आदिवासी
कलाकार श्री.लक्ष्मण कुबरा यांचे भांगसर थाळी वादन.

संस्थेत नव्याने तयार करण्यात आलेल्या
धबधब्यात मासेमारी करणारा ठाकर आदिवासी

TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune - 411 001.

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

Guidelines for Contributors :

The manuscripts to be published in this Bulletin should be type written in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organised under suitable headings. Tables should be preferrably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the editor is not responsible for the views expressed by the authors.

The contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondence should be addressed to the *Commissioner, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune 411 001.*

Registration No.RN-37/438/79

FORM IV

(See Rule 80)

1. Place of Publication	: 28, Queen's Garden Pune 411 001.
2. Periodicity of Publication	: Bi-annual
3. Printer's Name	: Manager Photozinco Press, Pune 411 001.
Nationality	: Indian
Address	: Photozinco Press, Pune 411 001.
4. Publisher's Name	:Shri R.D.Kharosekar I.A.S.
Nationality	: Indian
Address	: 28, Queen's Garden Pune 411 001.
5. Editor's Name	: Shri R.D.Kharosekar I.A.S.
Nationality	: Indian
Address	: 28, Queen's Garden Pune 411 001.

I, R.D.Kharosekar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

31th March., 2001 *R.D.Kharosekar*
(Signature of Publisher)

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs. 50/-

PRINTED AT THE GOVT. PHOTOZINCO PRESS, PUNE